अलिबाग येथे ऑफीसमध्ये रिसेप्शनसाठी मुलगा/मुलगी पाहिजे.
संपर्क
९१७५७०८९०६/ ८९७५८१६९००

# कृषीवल

रायगड, मंगळवार, दि. २४ मार्च २०२६

किंमत ४ ₹

सी साईट रिसॉर्ट (नागांव)
कुक, वेटर व हाऊसकिपींग स्टाफ पाहिजे
संपर्क : ९४२२८५६३३६ ७३८५९६५८८५

## वे|ध|क

### यात्रेनिमित्त टोलमाफी

**मुंबई :** लोणावळा येथील एकवीरा देवीच्या यात्रेला मंगळवार दि.२४ मार्चपासून सुरूवात होणार आहे. तीन दिवस चालणाऱ्या या यात्रेसाठी मुंबई, ठाणे, रायगड व उपनगरातील आगरी कोळी समाजासह विविध जातीधर्मातील भाविक दर्शनासाठी मोठी गर्दी करतात. त्यामुळे यावर तोडगा म्हणून खासदार सुरेश म्हात्रे ऊर्फ बाळ्यामामा यांनी यात्रेदरम्यान तीन दिवस टोल माफ करण्यात यावा, अशी विनंती केली होती. त्यांनी केलेल्या विनंतीनंतर मुंबई-पुणे महामार्ग व टोल प्रशासनाने या मागणीला सकारात्मक उत्तर देत टोल प्रशासनाने मंगळवार ते गुरुवार या दरम्यान भाविकांसाठी टोलमाफी घोषित केली आहे. मात्र, टोलमाफीसाठी भाविकांना टोलमाफीचे पत्र दाखवणे आवश्यक असणार आहे.

### आज निवडणूक

**अलिबाग :** महाराष्ट्र गोवा बार असोसिएशन म्हणजेच राज्यातील वकिलांची शिखर संघटना असलेल्या राज्य वकील परिषदेच्या निवडणुकीसाठी आज (दि.२४) मतदान होणार आहे. या निवडणूकीसाठी महाराष्ट्र, गोवा, दादर नगर हवेली आणि दमण दीव येथील मिळून १५५ उमेदवार निवडणूक रिंगणात आहे.यंदा पहिल्यांदाच महिलांना आरक्षण देण्यात आले आहे. हे २३ जागांसाठी मतदान होत आहे. त्यामध्ये १८ जण सर्वसाधारण गटातून विजयी होणार आहेत. तर, ५ महिला राखीव गटातून उमेदवार विजयी होणार आहे. निवडणूकीनंतर दोन महिलांची निवड स्विकृत पद्धतीने होणार आहे. परिषेदासाठी एकुण १ लाख ९० हजार ते १ लाख ९५ हजार वकील मतदानाचा हक्क बजावणार आहेत.

### समुद्रात तरुणाचा बुडून मृत्यू



**श्रीवर्धन :** रायगड जिल्ह्यातील निसर्गरम्य आणि पर्यटकांच्या पसंतीस उतरलेल्या दिवेआगर समुद्रकिनाऱ्यावर शनिवारी (दि.२१) एक दुर्दैवी घटना घडली. पुण्यातील २१ वर्षीय सिद्धार्थ रमेश धिंडळे या तरुणाचा येथील समुद्रात बुडून मृत्यू झाला. त्यामुळे पर्यटनस्थळी सुरक्षेच्या उपाययोजनांबाबत पुन्हा गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, सिद्धार्थ धिंडले हा पुण्यातील हवेली येथील शिवदर्शन चाळ परिसरातील रहिवासी असून, तो आपल्या •> पान २ वर

### रेल्वे तपासणीत लाखोंचा गुटखा जप्त

**नेरळ :** कर्जत स्थानकात आलेल्या प्रवासी एक्स्प्रेस गाडीची रेल सुरक्षा दलाकडून तपासणी सुरू असताना त्यांच्या हाती मोठे घबाड लागले आहे. या पथकाने एक्स्प्रेसमधून गुटखा मसाला, पान मसाला आणि तंबाखू असा दोन लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी कर्जत रेल्वे स्थानकात दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.कर्जत रेल्वे स्थानकात सकाळी सात वाजता आलेल्या इंदौर-दौंड एक्स्प्रेस (डाऊन ट्रेन क्रमांक २२९४४) गाडीची रेल सुरक्षा दलाचे जवान बाबुशा इंगोले आणि शेषराव खिल्लारे यांच्याकडून नियमित तपासणी सुरू होती. यावेळी एस दोन या डब्यातून प्रवास करणाऱ्या •> पान २ वर

## राजिप प्राथमिक शिक्षण विभागाला

# रिक्त पदांचे ग्रहण


**विस्तार अधिकारी ते शिक्षक अशी ९७१ पदे रिक्त**

**शिक्षण विभागाला हवेत १४५ केंद्रप्रमुख**

**९२ शाळा मुख्याध्यापकांविना सुरु**

**सुयोग आंग्रे**
**। रायगड ।**

केंद्र आणि राज्य शासनाचा शिक्षण विभाग गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी नवनवीन प्रयोग करीत असते. शिक्षणमंत्री ते शिक्षक साऱ्यांनाच राबविले जाणारे शैक्षणिक उपक्रम यशस्वी करण्यासाठी धडपड करण्याचे दिव्य उचलावे लागते. एकीकडे नियमित शिक्षण आणि दुसरीकडे शैक्षणिक उपक्रम यामध्ये शिक्षकांची दमछाक होत असल्याचे चित्र सर्वत्र पाहावयास मिळते. रायगड जिल्हा परिषद शिक्षण विभागाची काही वेगळी कथा नाही. विद्यार्थ्यांना ज्ञानाधिष्ठित करण्यासाठी लागणारे शिक्षक ते जिल्ह्याचा शैक्षणिक आलेख उंचावण्याची जबाबदारी असणारे विस्तार अधिकारी अशी तब्बल ९७१ पदे



रायगड जि.प.च्या प्राथमिक शिक्षण विभागातील आहेत. या रिक्त पदांमुळे आपसूकच असणाऱ्या अधिकारी आणि शिक्षकांवर कामाचा अधिकच ताण पडत असल्याचे चित्र जिल्ह्यात आहे.

रा.जि.प.च्या प्राथमिक शिक्षण विभागामध्ये सक्षम शिक्षणाधिकारी आणि उपशिक्षणाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली प्राथमिक शाळांमधील शैक्षणिक गुणवत्ता वाढावी आणि टिकून राहावी यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

**९७१ रिक्त पदे**

शिक्षण विभागामधील मंजूर आणि भरलेल्या पदांच्या तुलनेत डोळे विस्फारायला लावणारी रिक्त पदांची संख्या आहे. या पदांची संख्या ९७१ आहे. त्यामध्ये विस्तार अधिकारी श्रेणी २ वर्ग ३ मधील पदोन्नतीने भरली जाणारी ३ पदे, विस्तार अधिकारी श्रेणी २ वर्ग ३ स्पर्धात्मक परीक्षांमधून म्हणजेच सरळसेवा भरतीमधून भरली जाणारी ५ पदे, विस्तार अधिकारी श्रेणी ३ वर्ग ३ची पदोन्नतीने भरली जाणारी ३८ पदे, केंद्रप्रमुखांची सरळसेवेतून भरली जाणारी ११४ पदे, तर पदोन्नतीने भरली जाणारी ३१ पदे अशी एकूण १४५ केंद्रप्रमुखांची पदे रिक्त आहेत. पदोन्नतीने भरली जाणारी मुख्याध्यपकांची ९२ पदे रिक्त आहेत. प्राथमिक शिक्षकांची सरळसेवेतून भरली जाणारी ६८८ पदे रिक्त आहेत.

> “जिल्हा परिषद शिक्षण विभागात असणाऱ्या रिक्त पदांसंदर्भात शासनस्तरावर पाठपुरावा सुरु आहे. शासनाचे मार्गदर्शन आणि सूचनांनुसार भविष्यात ही रिक्त पदे भरली जाणार आहेत. त्यामधील शिक्षकांची रिक्त पदे सरळसेवा भारतीमधून भरली जाणार आहेत. केंद्रप्रमुखांची रिक्त पदे ही सरळ सेवेतून आणि काही पदोन्नतीने भरली जाणार आहेत. पदोन्नतीने भरली जाणारी पदे विभागांतर्गत परीक्षांमधून भरली जाणार आहेत. मुख्याध्यापकांच्या रिक्त पदांबाबत न्यायालयात याचिका दाखल आहे. त्याचा निर्णय झाल्यानंतरच ही पदे पदोन्नतीने भरली जाणार आहेत.”
>
> – ललिता दहितुले (कावडे), राजिप प्राथमिक शिक्षणाधिकारी

त्यांचे प्रयत्न यशस्वी होत असले तरी प्राथमिक शिक्षण विभागाकडे मंजूर असणाऱ्या पदांपैकी रिक्त असणाऱ्या पदांमुळे लक्ष वेधले जात आहे. रा.जि.प.च्या शिक्षण विभागाकडे ६ हजार ७२९ पदे मंजूर आहेत. या मंजूर पदांच्या अनुषंगाने ५ हजार ७५८ पदांची भरती करण्यात आली आहे. असे असले तरी अद्यापही ९७१ पदे रिक्त असल्याची आकडेवारी समोर आली आहे.

जि.प.च्या शिक्षण विभागामध्ये मंजूर असणाऱ्या ६ हजार ७२९ पदांमध्ये विस्तार •> पान २ वर

## ज्योतिबा मंदिरात पुजाऱ्यांकडून भाविकांना मारहाण

**। कोल्हापूर । प्रतिनिधी ।**



प्रसिद्ध ज्योतिबा मंदिरातील धक्कादायक प्रकार समोर आला आहे. ज्यातिबा मंदिर परिसरात काही पुजाऱ्यांकडून परीते गावातील दोन भाविकांना बेदम मारहाण केल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. या घटनेमुळे भाविकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. तर, व्हिडिओत दोन ते तीन पुजाऱ्यांनी भाविकांच्या डोक्यात नारळ मारल्याचेही समोर आले आहे. ही मारहाण नेमकी कोणत्या कारणावरून झाली, याबाबत अद्याप स्पष्ट माहिती समोर आलेली नाही.

दरम्यान, एका बाजूला काही नागरिक मद्यप्राशन करुन हुलडबाजी करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच, देवकार्यात आणि देवाच्या छबिना सोबत छेडछाड केल्याच्या प्रकरणातून ही मारहाण झाल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, परिते ग्रामस्थांनी मात्र हे सगळे आरोप फेटाळून लावले आहेत. मद्य प्राशन केल्याचा दावा खोडून काढत ज्योतिबा मंदिरामधील पुजाऱ्यांनी या वादाची सुरुवात केल्याचे परिते ग्रामस्थांचे म्हणणे आहे. या प्रकरणात परिते गावातील भाविकांना पुजाऱ्यांनी मारहाण केल्यामुळे गावकरी आक्रमक झालेले आहेत. परिते गावातील ग्रामस्थांनी आज गावात निषेध फेरी काढत या घटनेचा निषेध नोंदवला आहे. मारहाण करणाऱ्या संबंधित पुजाऱ्यांवर कारवाईची मागणीदेखील केली आहे.

## दिव्यांगांच्या स्टॉल नूतनीकरणासाठी मोर्चा



**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल महानगरपालिका हद्दीतील दिव्यांग व्यक्तींना देण्यात आलेल्या स्टॉलच्या परवान्यांचे नूतनीकरण व अतिक्रमण विरोधी पथकाकडून होणाऱ्या कारवाईच्या निषेधार्थ प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेच्यावतीने सोमवारी (दि.२३) महापालिकेच्या कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात मोठ्या संख्येने दिव्यांग बांधव सहभागी झाले होते.

यावेळी पनवेल महापालिकेचे विरोधी पक्षनेते अरविंद •> पान २ वर

**आरक्षित पदांवर तडजोड**

# खजिन्यासाठी महायुतीत फूट उघड

## ७ एप्रिलला होणार निर्णय; ‘अर्थ व बांधकाम’ राष्ट्रवादीकडे जाणार?

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग येथे जिल्हा परिषद विषय समिती सभापती पदांच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सोमवारी (दि.२३) पार पडली. यावेळी महायुतीत वरवर एकजूट दिसत असली, तरी जिल्हा परिषदेच्या अर्थ व बांधकाम खात्यावरून आतून धुमसणारी सत्तेची लढाई आता उघड झाली आहे. भाजप आणि शिवसेना या दोन्ही पक्षांनी या पॉवरफुल खात्यावर दावा ठोकताच मैत्रीपेक्षा सत्ता मोठी असल्याचं स्पष्ट झालं आहे. अलिकडेच जिल्हा परिषदेचे अध्यक्ष व उपाध्यक्षपदाची निवड करण्यात आली होती. जास्त उमेदवार निवडून आल्यानंतरही शिवसेना शिंदे गटाला



सत्ता स्थापनेतून बाजूला सारण्यात आले होते. त्यामुळे शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांमध्ये नाराजी पसरली होती. अखेर शिंदे गटाने नमते घेत सत्ता स्थापनेत भाग घेतला आणि जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष आणि उपाध्यक्षपदाला मान्यता दिली. परिणामी जिल्हा परिषदेतील खजिन्याच्या चाव्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे गेले असे •> पान २ वर

### सत्तेसाठी नाही, लोकहितासाठी राजकारण : वैकुंठ पाटील

लोकांनी विश्वासाने निवडून दिले आहे. त्यामुळे समाजहितासाठी काम करणे, हे कर्तव्य आहे. समाजातील अडचणी सोडविण्यासाठी काम केले जाणार आहे. वरिष्ठ जो निर्णय घेतील, तो मान्य असेल. महायुतीत कोणतेही वाद नसून सामंजस्याने खातेवाटप होईल. येत्या ७ तारखेला त्यावर निर्णय होईल. मात्र या निर्णयाचा परिणाम समाजहितावर होणार नाही.

### भोईरांचे स्वप्न भंगले, वैकुंठ पाटलांना आरोग्य मिळाले

रायगड जिल्हा परिषदेच्या दोन विषय समित्यांसह समाजकल्याण, महिला व बालकल्याण सभापतीपदाची निवड सोमवारी(दि. २३) पार पडली. समाजकल्याण सभापतीपदी नारायण डामसे यांची निवड करण्यात आली. त्यामुळे शिंदे गटातील दिलीप भोईर यांचे समाजकल्याण सभापतीपदाचे स्वप्न भंगले असल्याची चर्चा सध्या सुरु आहे. त्यामुळे दिलीप भोईर समर्थकांमध्ये नाराजीचे सुर उमटत आहेत. दरम्यान, विषय समिती एकच्या सभापती पदासाठी वैकुंठ पाटील व चंद्रकांत कळंबे यांची विषय समिती दोनच्या सभापतीपदी निवड झाली. यामध्ये शिक्षण व आरोग्य सभापती पद वैकुंठ पाटील यांना तर चंद्रकांत कळंबे यांना कृषी सभापती पद मिळाल्याचे बोलले जात आहे. शिंदे गटातील दिलीप भोईर हे जिल्हा परिषदेच्या सदस्य पदाची निवडणूक निवडून आल्यावर पुन्हा समाजकल्याण सभापती होणार, अशी जाहीरातबाजी सोशल मिडीयाद्वारेकरण्यात आली होती. परंतु, समाजकल्याण सभापतीपद राष्ट्रवादीचे नारायण डामसे यांच्याकडे दिल्याने दिलीप भोईर यांचे समाजकल्याण सभापती पदाचे स्वप्न भंगल्याची चर्चा आहे. जिल्हा परिषद अध्यक्षपद भाजपचे मंगेश वाकडीकर यांना देण्यात आले. त्यामुळे अर्थ व बांधकाम विभागाच्या सभापती म्हणजेच सत्तेच्या चाव्या राष्ट्रवादीकडे जाण्याची शक्यता राजकीय वर्तुळात आहे.

## दोनशे पदांसाठी होणार निवडणूक

**■ १२७ ग्रामपंचायतीत ३० सरपंच**
**■ १७० सदस्यपदासाठी होणार लढत**



**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

ग्रामपंचायतीच्या सरपंच व सदस्यपदाच्या २०० रिक्त जागांसाठी पोटनिवडणुकांचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. जिल्ह्यातील १२७ ग्रामपंचायतींमधील या जागांसाठी २८ एप्रिलला मतदानाला होणार असल्याची जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली आहे. त्यामुळे एप्रिलचा महिना ग्रामपंचायत निवडणुकीत जाणार आहे. या कालावधीत राजकीय वातावरण तापणार आहे.

उरण तालुका वगळता अन्य १४ तालुक्यांतील ग्रामपचायतींमध्ये निवडणुका होणार आहेत. अलिबाग तालुक्यातील ६ ग्रामपंचायतींमधील १० सदस्य व १ थेट सरपंच अशा ११ जागांसाठी लढत होणार आहे. मुरुडमधील ६ ग्रामपंचायतींमधील १५ सदस्यपदांसाठी लढत होणार आहे. पनवेलमधील २ ग्रामपंचायतींमधील २ सदस्यपदासाठी निवडणूक होणार आहे.कर्जतमधील४ग्रामपंचायतींच्या ६ सदस्य, खालापूरमधील ५ ग्रामपंचायतींच्या ६ सदस्य व १ सरपंच अशा ७ जागा. रोहामधील २ ग्रामपंचायतींच्या ५ सदस्य. माणगावमधील १६ ग्रामपंचायतींच्या १५ सदस्य व २ थेट सरपंच अशा एकूण १७ जागा. सुधागड (पाली) मधील ६ ग्रामपंचायतींच्या ७ सदस्य व १ थेट सरपंच अशा आठ जागा. तळामधील सहा ग्रामपंचायतींच्या १४ सदस्य. महाडमधील ३१ ग्रामपंचायतींच्या ३३ सदस्य व १३ थेट सरपंच अशा एकूण ४६ जागा. पोलादपूरमधील १७ ग्रामपंचायतींच्या १७ सदस्य, ५ सरपंच अशा एकूण २२ जागा. श्रीवर्धनमधील ८ ग्रामपंचायतींच्या १९ सदस्य आणि ३ थेट सरपंच अशा एकूण २२ जागा. म्हसळामधील ११ ग्रामपंचायतींच्या १२ सदस्य आणि २ थेट सरपंच अशा एकूण १४ जागांसाठी निवडणूक होणार आहे. •> पान २ वर

## मुंबई-गोवा मार्गावर टेम्पो पेटला



**। कोलाड । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा महामार्गवरील खांब ग्रामपंचायतीसमोरील पुलावरून जाणाऱ्या भरधाव गादी वाहून नेणाऱ्या टेम्पोन अचानक पेट घेतला. मात्र, स्थानिक नागरिकांनी प्रसंगावधान दाखवून आग ती आटोक्यात आणली. त्यामुळे मोठा अनर्थ टळला असून, कोणतेही जीवितहानी झालेली नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, मुंबई-गोवा महामार्गावरून सोमवारी (दि.२३) दुपारी १.०० वाजण्याच्या सुमारास खांब ग्रामपंचायतीसमोर असलेल्या पुलावरून खांब बाजूकडून कोलाड बाजूकडे गादी घेऊन एक टेम्पो जात होता. त्या भरधाव टेम्पोने अचानक पेट घेतला. ही बाब स्थानिक नागरिक व प्रवाशांच्या लक्षात येताच त्यांनी घटनास्थळी धाव घेतली व प्रसंगावधान दाखवत आग आटोक्यात आणली. त्यामुळे मोठा अनर्थ टळला. याची माहिती मिळताच रेक्यू टीम देखील घटनास्थळी दाखल झाली. मात्र, तोपर्यंत स्थानिक नागरिकांनी आग आटोक्यात आणली होती. यादरम्यान, टेम्पोसह काही गाद्यांचे नुकसान झाले आहे.

## कारची दोन दुचाकींना धडक

**। माणगाव । प्रतिनिधी ।**



रोहित मुंढे (२१) हे रविवारी (दि.२२) रात्री पावणेबाराच्या सुमारास स्कुटीवरून चुलत भावासोबत गोवा-मुंबई महामार्गावरुन त्यांच्या दाखणे गावाकडे जात होते. ते नाणोरे गावानजीक असलेल्या एचपी पेट्रोल पंपजावळ आले असता त्यांच्या समोरुन येणाऱ्या नेक्सा कारचे चालक अमित मेहता (४३) यांचे कारवरील नियंत्रण सुटले व दुचाकीला समोरून धडक दिली. या धडकेत स्कुटीवरील रोहित मुंढे व त्यांचा चुलत भाऊ हे दोघेही जखमी झाले. तसेच, त्यांच्या पाठीमागून येणाऱ्या मोटारसायकलची स्कुटीला धडक बसल्याने त्यावरील तिघेजण देखील जखमी झाले. त्यामुळे या अपघातात दोन्ही दुचाकींचे आणि कारचे नुकसान झाले असून, एकूण पाच जण जखमी झाले आहेत.

**गॅस पुरवठ्याबाबत महत्त्वपूर्ण पाऊल | हॉटेल, उद्योगांना मोठा दिलासा**

# व्यावसायिक सिलिंडरच्या कोट्यात वाढ

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

देशातील व्यावसायिक एलपीजी गॅसच्या पुरवठ्याबाबत केंद्र सरकारने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. राज्यांना दिल्या जाणाऱ्या एकूण कोट्यात आता ५० टक्क्यांपर्यंत मोठी वाढ करण्यात आली आहे. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाचे सचिव डॉ. नीरज मित्तल यांनी सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांना पत्राद्वारे या निर्णयाची माहिती दिली आहे. या निर्णयाची अंमलबजावणी राज्य शासनाच्या सूचनेनुसार करण्यात येईल, अशी माहिती रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिली आहे.

या नव्या धोरणानुसार,



राज्यांना यापूर्वी मिळणाऱ्या २० टक्के आणि त्यानंतर सुधारणांच्या आधारे वाढविण्यात आलेल्या १० टक्के कोट्याव्यतिरिक्त आता अतिरिक्त २० टक्के कोटा मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे व्यावसायिक एलपीजीचा एकूण पुरवठा आता संकटपूर्व काळातील पातळीच्या ५० टक्क्यांवर पोहोचला आहे. या वाढीव कोट्याचा सर्वाधिक फायदा रेस्टॉरंट्स, ढाबे, हॉटेल्स, औद्योगिक कॅन्टीन, अन्न प्रक्रिया उद्योग, दुग्धशाळा आणि सरकारी अनुदानित अन्न केंद्रांना होणार आहे. तसेच, स्थलांतरित मजुरांसाठी उपलब्ध असलेल्या पाच किलोच्या एफटीएल सिलिंडर पुरवठ्यालाही यात प्राधान्य देण्यात आले आहे.


या सुविधेचा लाभ घेण्यासाठी सरकारने काही अटीही लागू केल्या आहेत. सर्व व्यावसायिक आणि औद्योगिक एलपीजी ग्राहकांना संबंधित तेल कंपन्यांकडे आपली अधिकृत नोंदणी करणे अनिवार्य करण्यात आले आहे. या कंपन्या ग्राहकांच्या वार्षिक वापराचा आणि त्यांच्या क्षेत्राचा संपूर्ण रेकॉर्ड ठेवणार •> पान २ वर

**१४.२ किलोचे सिलिंडर १० किलोवर**

गेल्या आठवड्यात, दोन जहाजांमार्फत अंदाजे ९२७०० टन गॅस आला, तो केवळ एका दिवसाच्या वापराएवढा आहे. शिवाय, व्यावसायिक वापरकर्त्यांना पुरवठा पुन्हा सुरू झाल्यामुळे उपलब्ध साठ्यावर आणखी दबाव वाढला आहे. त्यामुळे घरगुती गॅस सिलिंडरमधून पुरवल्या जाणाऱ्या एलपीजीचे प्रमाण कमी करण्याचा विचार सुरु आहे. १४.२ किलोच्या सिलिंडरएवजी आता १० किलो गॅस देण्याची योजना विचाराधीन असल्याची माहिती मिळत आहे. जर सिलिंडरमधील गॅसचे प्रमाण कमी करण्याचा निर्णय अंमलात आणला गेला, तर त्याची किंमतही त्यानुसारच ठरवली जाईल.

## भूतिवली कालव्याची माती चोरीला

**पाटबंधारे खात्याचे दुर्लक्ष**





**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील रेल्वे पट्ट्यातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी राज्य सरकारने पाली भूतिवली धरणाची बांधणी केली होती. परंतु, या धरणातले पाणी २५ वर्षांनंतरदेखील शेतीसाठी मिळाले नाही. मात्र, आता त्याच धरणाच्या कालव्यातील मातीची चोरी सुरू असून, शासन डोळ्यावर पट्टी बांधल्यासारखे गप्प आहे. दरम्यान, ते कालवे खोदण्यासाठी आलेला नऊ कोटींचा खर्च धरणाचे प्रमुख अधिकारी यांच्याकडून वसूल करून घ्यावा, अशी मागणी स्थानिक शेतकऱ्यांनी केली आहे.

कर्जत तालुक्यातील कर्जत-नेरळ रेल्वे पट्टा भागातील पाणीटंचाई कमी करण्यासाठी पाली भूतिवली धरणाला मंजुरी देऊन कामाला सुरूवात करण्यात आली होती. २००३ मध्ये धरणाच्या मुख्य जलाशयात पाणीसाठा झाल्याने परिसरातील जमिनीची भूजल क्षमता वाढली. त्याच धरणाच्या पाण्याचा वापर हा प्रामुख्याने शेतीसाठी होणार होता. त्यासाठी १५ किलोमीटर लांबीचे कालवे खोदले जाणार होते. सन २००६ साली कालवे खोदण्यास सुरुवात झाली. त्यासाठी शासनाने तब्बल ९ कोटी रुपये खर्चदेखील केले आहेत. मात्र, जेमतेम ६ किलोमीटर लांबीचे कालवे बांधून पूर्ण झाले असून, संपूर्ण कालव्यांची कामे आजही अपूर्ण आहेत. असे असताना त्या कालव्यात पाणी सोडण्याची तयारी गेल्या २० वर्षांत पाटबंधारे खात्याने दाखवली नाही •> पान २ वर

# मिठागर कांदळवन तोडप्रकरणी पोलिसांचा अहवाल नाकारला

## पुन्हा तपास करण्याचे न्यायालयाने दिले आदेश

| रेवदंडा | विशेष प्रतिनिधी |

रायगड जिल्ह्यातील मुरुड तालुक्यातील मिठागर येथील कांदळवन (मँग्रोव्ह) तोड प्रकरणाला न्यायालयीन वळण मिळाले असून, मुरुड पोलिसांनी सादर केलेला क-समरी अहवाल न्यायालयाने फेटाळून लावत तपास पुन्हा सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. ५ जुलै २०२४ रोजी मुरुड पोलीस ठाण्यात नोंद झालेल्या या गुन्ह्याचा तपास पूर्ण झाल्याचे दाखवत अहवाल सादर करण्यात आला होता. मात्र, न्यायालयाने तपासातील त्रुटी लक्षात घेत हा अहवाल नाकारला.




सदर प्रकरण हे केवळ कांदळवन तोडीपुरते मर्यादित नसून, भूसंपादन, भराव, अनधिकृत बांधकाम तसेच वनखात्याच्या परवानगीशिवाय झालेल्या हस्तक्षेपासह अनेक कायदेशीर उल्लंघनांचा समावेश असल्याचे स्पष्ट झाले आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक रसेडे आणि पोलीस उपनिरीक्षक राठोड यांच्याकडे तपासाची जबाबदारी होती. २१ फेब्रुवारी २०२५ रोजी तपास थांबवून अहवाल सादर करण्यात आला होता, मात्र २४ फेब्रुवारी २०२५ रोजी न्यायालयाने तो फेटाळून पुन्हा तपासाचे आदेश दिल्याने प्रकरण अद्याप प्रलंबित आहे.

दरम्यान, तक्रारदार महेश जानू ठाकूर यांनी माहिती अधिकाराद्वारे तपासातीलत्रुटीउघडकरण्याचाप्रयत्न केला. मात्र, 'तपास सुरू आहे' या कारणावरून माहिती देण्यास नकार देण्यात आला. अपील केल्यानंतरही माहिती नाकारण्यात आली. आरटीआयमधून समोर आलेल्या माहितीनुसार साक्षीदारांची चौकशी, वन विभागाचा तज्ज्ञ अहवाल आणि संबंधित कागदपत्रांची तपासणी अपुरी राहिल्याचे दिसून येते.

या प्रकरणात 'सुयोग फार्म'चे मालक संतोष पोवळे यांच्यावरही हस्तक्षेपाचे आरोप करण्यात आले असून, न्यायालयाच्या आदेशानंतर या सर्व बाबींची सखोल चौकशी होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. कायद्याच्या दृष्टीने या प्रकरणात पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम तसेच वन आणि महसूल नियमांचे उल्लंघन झाल्याचे नमूद आहे. त्यामुळे केवळ खाजगी मालक नव्हे, तर वन, महसूल आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या भूमिकेचीही चौकशी आवश्यक ठरत आहे.

दरम्यान, अलिबाग तालुक्यातील रेवदंडा परिसरातही कांदळवन तोड आणि अनधिकृत बांधकामांच्या घटना समोर आल्याने हे प्रकरण व्यापक स्वरूप धारण करत आहे. स्थानिकांकडून अधिकाऱ्यांच्या निष्क्रियतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

> **या प्रकरणात प्रांत अधिकाऱ्यांना तपास करण्याचे आदेश दिले आहे. अद्याप त्यांच्याकडून अहवाल प्राप्त झालेला नाही.**
> **– कुलदीप पाटकर, वन परिक्षेत्र कांदळवन अधिकारी**

या पार्श्वभूमीवर महसूल, वन व गृह विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी होत असून, सुरू असलेल्या विधानसभेच्या अधिवेशनात या प्रकरणाची दखल घेण्याची गरज व्यक्त होत आहे. पारदर्शक आणि स्वतंत्र चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिक, पर्यावरणप्रेमी आणि सामाजिक कार्यकर्त्यांकडून होत आहे.

# 'जलजीवन'चा फज्जा

■ **१३१ पैकी केवळ ३७ कामे पूर्ण**

■ **शंभरहून अधिक प्रकल्प रखडले**

| पनवेल | विशेष प्रतिनिधी |

केंद्र व राज्य सरकारच्या महत्वाकांक्षी जलजीवन मिशन योजनेंतर्गत पनवेल तालुक्यात सुरू असलेल्या पाणीपुरवठा प्रकल्पांची कामे अद्याप संथ गतीने सुरू असून, बहुतांश ठिकाणी ही कामे अपूर्ण अवस्थेत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. तालुक्यात एकूण १३१ ठिकाणी या योजनेची कामे सुरू करण्यात आली होती. मात्र, त्यापैकी केवळ ३७ कामेच पूर्ण झाल्याची माहिती पंचायत समिती पनवेलच्या पाणीपुरवठा विभागाकडून देण्यात आली आहे. त्यामुळे उर्वरित शंभरहून अधिक कामे नेमकी कधी पूर्ण होणार, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

गेल्या तीन ते चार वर्षांपासून सुरू असलेल्या या योजनेची सुरुवातच अपेक्षेप्रमाणे वेगाने झाली नाही. सुरुवातीपासूनच निधीची कमतरता, आवश्यक जागा उपलब्ध न होणे, प्रशासकीय अडचणी आणि नियोजनातील त्रुटी यामुळे अनेक प्रकल्प अडचणीत सापडले. काही ठिकाणी कंत्राटदारांनी एकाच वेळी अनेक कामे हाती घेतल्याने कोणतेही काम वेळेत पूर्ण होऊ शकले नाही. परिणामी, अनेक गावे आजही अपूर्ण योजनांच्या प्रतीक्षेत आहेत.याशिवाय, निधीअभावी कंत्राटदारांना देयके वेळेवर न मिळाल्याने कामांचा वेग आणखी मंदावला आहे. सध्या तालुक्यातील सुमारे ३० पेक्षा अधिक कामे पूर्णपणे बंद अवस्थेत असल्याची माहिती समोर येत असून, उर्वरित कामेही अत्यंत संथ गतीने सुरू आहेत. काही ठिकाणी केवळ पाईपलाईन टाकून काम अर्धवट सोडण्यात आले आहे, तर काही ठिकाणी जलसाठा टाक्या आणि इतर मूलभूत सुविधा अपूर्ण अवस्थेत आहेत.दरम्यान, उन्हाळ्याची तीव्रता वाढत असल्याने पनवेल तालुक्यातील अनेक गावांमध्ये पाणीटंचाईची समस्या गंभीर होत चालली आहे. नागरिकांना टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे.


## निवडक

### विविध विकासकामांचे भूमीपूजन

**तळा :** राज्याच्या महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते तळा शहरातील विविध विकासकामांचे भूमीपूजन व लोकार्पण उत्साहात पार पडले. शहरातील मेट मोहल्ला व वडाची



वाडी येथे हायमास्ट दिवे बसविण्यात येणार असून, त्याचे भूमीपूजन तसेच वडाची वाडी येथील रस्ता काँक्रिटीकरण कामाचे भूमीपूजन मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते पार पडले.दरम्यान, बोरघर हवेली येथे असलेल्या तालुका क्रीडा संकुल तळा येथे जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत मंजूर करण्यात आलेली अद्ययावत अशी व्यायामशाळा व क्रीडा साहित्यांचा लोकार्पण सोहळादेखील मंत्री आदिती तटकरे यांच्या उपस्थितीत पार पडला. याप्रसंगी तळा पंचायत समिती सभापती नथुराम मुकण, उपसभापती रवि मांडवकर, जिल्हा परिषद सदस्या गीता जाधव, तालुका अध्यक्ष नाना भौड, महिला तालुका अध्यक्षा जान्हवी शिंदे, नगराध्यक्षा माधुरी घोलप, उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे यांसह राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### तळा येथे शहिदांना अभिवादन

**तळा :** भारतीय स्वातंत्र्यलढ्यात अमूल्य योगदान देणारे क्रांतिकारक भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांच्या स्मृतिदिनानिमित्त २३ मार्च रोजी 'शहीद दिन'निमित्त जी. एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्स, तळा येथे भावपूर्ण वातावरणात आदरांजली कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सचिन बंगाळे यांच्या हस्ते शहिदांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी उपस्थितांनी दोन मिनिटे मौन पाळून थोर क्रांतिकारकांना श्रद्धांजली अर्पण केली. आपल्या मनोगतात प्राचार्य डॉ. बंगाळे यांनी भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव हे केवळ क्रांतिकारक नसून तरुणांसाठी प्रेरणास्थान असल्याचे सांगितले. सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. अमोल निकम यांनी शहीदांच्या कार्याचा आढावा घेताना २३ मार्च १९३१ रोजी लाहोर तुरुंगात तिघांना फाशी देण्यात आल्याची ऐतिहासिक माहिती दिली. कार्यक्रमास रसायनशास्त्र विभागप्रमुख प्रा. जयदीप देवरे, डॉ. विजय रायकर, तसेच आयटी व सीएस विभाग प्रमुख प्रा. मनस्वी वाडवळ यांची प्रमुख उपस्थिती होती. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत, भाषणे आणि विचारांद्वारे शहीदांना अभिवादन केले.



### उसाच्या रसाला वाढती मागणी

**उरण :** वाढत्या उष्णतेमुळे शरीराला थंडावा मिळवण्यासाठी नागरिक विविध पर्यायांचा अवलंब करत असून, सध्या उसाच्या रसाला विशेष मागणी वाढलेली दिसून येत आहे. कुणी लिंबूपाणी तर कुणी थंड पेये पसंत करत असले तरी आरोग्यदायी पर्याय म्हणून उसाचा रस अनेकांच्या पसंतीस उतरत आहे. उन्हाची तीव्रता वाढताच उरण शहरातील उसाच्या रसाच्या गाड्यांवर ग्राहकांची गर्दी वाढू लागली आहे. उसाचा रस शरीराला त्वरित ऊर्जा देतो तसेच शरीर हायड्रेट ठेवण्यास मदत करतो, त्यामुळे त्याचे सेवन मोठ्या प्रमाणावर होत आहे. उरण शहरातील वाणी आळी, राजपाल नाका, कामगार वसाहत, आनंदनगर, तसेच एन.आय. हायस्कूल परिसरात अनेक ठिकाणी उसाच्या रसाचे चरखे सुरू झाले असून, दुपारच्या वेळेस येथे ग्राहकांची विशेष गर्दी दिसून येते. जसजसे तापमान वाढते, तसतशी रस पिणाऱ्यांची संख्या अधिक वाढताना दिसते. गेली ४० वर्षे आम्ही उसाचा रस विकत आहोत. सध्या एक ग्लास २० रुपयांना विक्री करतो. उन्हाळ्यात मागणी मोठ्या प्रमाणावर वाढते, अशी माहिती जय भवानी रसवंतीगृहाचे ज्ञानेश्वर शिवराम दामगुडे यांनी दिली.

## गॅस तुटवड्याने व्यावसायिक संकटात

| कोलाड | प्रतिनिधी |

इराण-इस्रायल संघर्षामुळे होर्मूझ सामुद्रधुनीत अडथळे निर्माण झाल्याने भारतातील एलपीजी पुरवठा विस्कळीत झाला असून, व्यावसायिक गॅस सिलिंडरचा तीव्र तुटवडा निर्माण झाला आहे. याचा थेट परिणाम हॉटेल्स, टपऱ्या आणि खाद्य व्यवसायावर होत असून, अनेक ठिकाणी व्यवसाय बंद पडण्याच्या मार्गावर आहेत.



गॅस उपलब्ध नसल्याने व्यावसायिकांना चुली किंवा लाकडाचा वापर करावा लागत आहे. त्यामुळे स्वयंपाकासाठी अधिक वेळ लागत असून, ग्राहकांच्या ऑर्डर पूर्ण करण्यात अडचणी येत आहेत. परिणामी, व्यवसायावर मोठा परिणाम होत असून, कामगारांच्या नोकऱ्याही धोक्यात आल्या आहेत. घरगुती गॅससाठीही नागरिकांच्या रांगा लागत असून ठरलेल्या दरापेक्षा जास्त पैसे घेतले जात असल्याच्या तक्रारी आहेत. गॅसअभावी चुलीवर स्वयंपाक करावा लागत असून, ऑर्डर पूर्ण करता येत नाहीत. लवकर गॅस मिळाला नाही तर हॉटेल बंद करण्याची वेळ येईल, अशी प्रतिक्रिया सुकेली येथील हॉटेल व्यावसायिक प्रसाद उंबरे यांनी दिली.

## व्यावसायिक सिलिंडर पाच हजार रुपयांना

**नवीन पनवेल :** व्यावसायिक सिलिंडर बंद झाल्याने पनवेल परिसरात व्यावसायिक सिलिंडरच्या विक्रीमध्ये काळा बाजार होत असल्याचे दिसत आहे. तब्बल पाच हजार रुपयांच्या पुढे व्यावसायिक सिलिंडरची विक्री केली जात आहे. तर काही ठिकाणी घरगुती सिलिंडरचा वापर होत आहे.

युद्धामुळेव्यावसायिकसिलिंडर देणे बंद करण्यात आले आहे, मात्र तरीदेखील या सिलिंडरची काळ्या बाजारात विक्री होत आहे. अनेक हॉटेल व्यावसायिक हे सिलिंडर काळ्या बाजारात खरेदी करत आहेत. पनवेल पुरवठा विभागाने याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

## कर्जतमध्ये गॅसटंचाई : लांब रांगांमुळे ग्राहक त्रस्त

| कर्जत | प्रतिनिधी |

कर्जत शहरात इंडियन गॅस आणि एचपी गॅस अंतर्गत घरगुती गॅस सिलिंडरचे वाटप सुरू असले तरी गॅस टंचाईमुळे ग्राहकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. शहरासह परिसरातील गावांमध्ये गॅससाठी लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे.



(छायाचित्रः संजय गायकवाड)

आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीचा परिणाम गॅस पुरवठ्यावर झाल्याने ही टंचाई निर्माण झाल्याचे सांगितले जात आहे. कर्जत परिसरातील इंडियन गॅस आणि एचपी गॅस एजन्सीकडून गॅस वाटप सुरू असले, तरी दोन वाहनांमधून होणाऱ्या वितरणामुळे मागणीच्या तुलनेत पुरवठा कमी पडत आहे. परिणामी एजन्सी केंद्राबाहेर ग्राहकांची मोठी गर्दी होत असून, रस्त्यावर वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत आहे.

गॅस बुकिंग, ओटीपी नोंदणी, केवायसी प्रक्रियेमुळे ग्राहकांना अधिक त्रास सहन करावा लागत असून अनेकांनी नाराजी व्यक्त केली आहे. राहाता तालुक्यात या दोनच एजन्सीमार्फत गॅस पुरवठा होत असल्याने टंचाई अधिक तीव्र जाणवत आहे. या परिस्थितीत गॅस सिलिंडरचा काळाबाजार होण्याची शक्यतादेखील व्यक्त केली जात आहे.

## नवखार येथे पाणपोईची उभारणी

### रांजणखार येथील नवरात्र उत्सव मंडळाचा पुढाकार

| खारेपाट | प्रतिनिधी |

रांजणखार येथील नवरात्र उत्सव मंडळाच्या पुढाकारातून बारांचा देव, नवखार येथे पाणपोई उभारून ग्रामस्थांसाठी २४ तास पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली आहे. या उपक्रमाचे उद्घाटन मंडळाच्या पदाधिकारी आणि ग्रामस्थांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडले.



याप्रसंगी मंडळाचे सदस्य मनोज पाटील, समीर पाटील, परेश पाटील, अतिश म्हात्रे, राजेंद्र पाटील, सुनील म्हात्रे, धनंजय पाटील यांच्यासह नवखारचे पोलीस पाटील, पंचायत समिती सदस्य प्रकाश पाटील, संतोष पाटील, संदीप पाटील, सुमित भगत, बाबाडीजे, ग्रुप क्रमांक चारचे सदस्य आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या पाणपोईच्या उभारणीचे काम पाटील ट्रेडर्स यांनी पूर्ण केले असून, गवंडी म्हणून गंगाधर ठाकूर, प्रफुल्ल म्हात्रे, परेश पाटील आणि जयवंत पाटील यांचे विशेष योगदान लाभले. तसेच जीवन म्हात्रे आणि अतिश म्हात्रे यांनी नळयोजनेचे काम यशस्वीरीत्या पूर्ण केले.

## पेणमध्ये तरुणीचा विनयभंग

| पेण | प्रतिनिधी |

पेण येथे नोकरीवरून काढल्याचा राग मनात धरून आरोपीने फिर्यादी व त्यांच्या कुटुंबाला फोनवरून धमक्या देत पैसे उकळले. तसेच तरुणीचा मोबाईलच्या माध्यमातून पाठलाग करून अश्लील संदेश पाठवत विनयभंग केल्याची तक्रार आहे. या प्रकारामुळे परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलिसांनी गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करून आरोपीचा शोध सुरू केला आहे. पीडित कुटुंबाला सुरक्षा देण्याची मागणी होत आहे.

## रस्त्यांच्या दुरवस्थेबाबत पत्रकारांचे तहसीलदारांना निवेदन सादर



| कोर्लई | प्रतिनिधी |

साळाव-मुरुड रस्त्यावरील सुरू असलेल्या कामांमधील घिसाडघाई तसेच परेशनाका ते एकदरा पूल या मार्गाच्या दुरवस्थेबाबत मुरुड तालुका मुक्त पत्रकार संघातर्फे तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. महसूल नायब तहसीलदार राजश्री साळवी यांनी हे निवेदन स्वीकारले.

यावेळी मुक्त पत्रकार संघाचे तालुका अध्यक्ष राजीव नेवासेकर, उपाध्यक्ष अजित कासार, प्रदीप बागडे, सचिव नरेश वारगे, सहसचिव नैनिता कर्णिक, खजिनदार पांडुरंग आरेकर, पत्रकार जाहिद फकजी आणि जिल्हा प्रतिनिधी ज्ञानेश्वर फलेभाई उपस्थित होते. रस्त्यांच्या कामावर त्यांनी प्रश्न उपस्थित केला.

## घेरावाडीतील पाणीटंचाई दूर

| रसायनी | प्रतिनिधी |

रसायनी परिसरातील आपटा ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील घेरावाडी या दुर्गम आदिवासी वाडीत दीर्घकाळापासून पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या होती. विशेषतः महिला वर्गाला दूरवरून पाणी आणावे लागत असल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले होते.



ही समस्या कायमस्वरूपी सोडवण्यासाठी पनवेल पंचायत समिती सदस्य मयूर शेलार यांनी पुढाकार घेतला. निवडणूक काळात दिलेले वचन पाळत त्यांनी घेरावाडीतील पाणीप्रश्न मार्गी लावला. पंचायत समितीच्या सभापती रंजना वास्कर यांच्या सहकार्याने मयूर शेलार यांच्या माध्यमातून येथे बोअरवेल खोदून मुबलक पाण्याची व्यवस्था करण्यात आली. या उपक्रमामुळे ग्रामस्थांची अनेक वर्षांची पाणीटंचाई दूर झाली असून, नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. कार्यक्रमावेळी माजी उपसरपंच ज्ञानेश्वर भोईर, सदस्य मारुती चव्हाण, दामू माडे, दर्शन भाईर, राजू देशमुख, पाणीपुरवठा विभागाचे श्री. चव्हाण, ग्रामसेवक कैलास मोरे, जनार्दन सावंत, गणपत पिरकड यांच्यासह घेरावाडीतील ग्रामस्थ उपस्थित होते.

## अलिबागमध्ये फ्लॅट फोडून चोरीचा प्रयत्न

| अलिबाग | प्रतिनिधी |

अलिबागमधील नातू रीजन्सी परिसरात बंद असलेल्या दोन फ्लॅटचे कुलूप तोडून अज्ञातांनी घरात प्रवेश केला. घरातील कपाटे फोडून सामान अस्ताव्यस्त टाकण्यात आले तसेच चोरीचा प्रयत्न करण्यात आला. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सुदैवाने मोठी चोरी टळली असली तरी सुरक्षेच्या दृष्टीने प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. रहिवाशांनी सुरक्षा व्यवस्था मजबूत करण्याची मागणी केली आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

## श्रीवर्धनमध्ये पथदिव्यांचा गोंधळ




| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

श्रीवर्धन नगरपरिषदेने सी.आर.एस. निधीतून नुकतेच शहरात नव्याने पथदिवे बसवून त्यांचे लोकार्पण केले होते. खा. सुनील तटकरे यांच्या हस्ते हा कार्यक्रम पार पडला होता. सौरऊर्जेवर चालणारे आणि आकर्षक स्वरूपाचे हे दिवे शहराच्या सुशोभीकरणासाठी बसविण्यात आले असले, तरी प्रत्यक्षात ते अद्याप महावितरणच्या विजेवरच सुरू असल्याचे दिसून येत आहे. यामुळे नगरपरिषदेवर वीज बिलाचा अतिरिक्त बोजा वाढत असल्याची चर्चा आहे. याशिवाय या पथदिव्यांसाठी बसवण्यात आलेली टायमर प्रणालीही चुकीची असल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली.

सध्या सायंकाळी सुमारे सहा वाजताच दिवे सुरू होतात, मात्र त्यावेळी पुरेसा उजेड असतो. उलट, सकाळी सहा वाजता, जेव्हा पूर्ण उजाडलेले नसते आणि परिसरात अंधार असतो, तेव्हा हे दिवे बंद होतात. या त्रुटीबाबत नगरपरिषदेला वारंवार कळवूनही अद्याप कोणतीही सुधारणा करण्यात आलेली नसल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे.

पथदिवे योग्य वेळी सुरू-बंद होण्यासाठी टायमर प्रणालीत तातडीने सुधारणा करणे आवश्यक असल्याचे नागरिकांनी सांगितले.

## किहीममधून १५ वर्षीय मुलगी बेपत्ता

| अलिबाग | प्रतिनिधी |

किहीम येथील आदिवासी वाडीतून १५ वर्षीय मुलगी अज्ञात इसमाने फूस लावून पळवून नेल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे पालक व ग्रामस्थांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा दाखल करून विविध पथकांमार्फत शोधमोहीम सुरू केली आहे. परिसरातील सीसीटीव्ही आणि साक्षीदारांची चौकशी सुरू आहे. मुलीचा लवकरात लवकर शोध लागावा, अशी मागणी होत आहे.

**रिक्षाचालकांना वाहतूक पोलिसांचा इशारा | प्रवाशांसोबत नम्रपणे वागण्याच्या सूचना**

# नियम पाळा, अन्यथा कारवाई करणार

| पनवेल | विशेष प्रतिनिधी |

प्रवाशांशी सौजन्याने वागावे, कोणत्याही परिस्थितीत भाडे नाकारू नये आणि वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करावे, अन्यथा कठोर कारवाईला सामोरे जावे लागेल, असा स्पष्ट इशारा वाहतूक पोलिसांनी रिक्षाचालकांना दिला. कळंबोली येथील सुधागड विद्यासंकुल सभागृहात सोमवारी आयोजित बैठकीत हा संदेश देण्यात आला.

पनवेल महापालिका क्षेत्रातील पनवेल, कळंबोली, कामोठे आणि खारघर परिसरातील रिक्षाचालक-मालक संघटनांची ही संयुक्त बैठक होती. या बैठकीत आरटीओ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन लाभले.



रिक्षाचालकांनी पांढरा गणवेश व बॅच परिधान करणे बंधनकारक असून, स्थानिक नाक्यांवर शिस्त राखावी, वाद टाळावेत आणि नागरिकांच्या सेवेला प्राधान्य द्यावे, अशा सूचना देण्यात आल्या.

यावेळी रिक्षाचालकांच्या विविध अडचणीही ऐकून घेण्यात आल्या. त्या सोडवण्यासाठी संबंधित विभागांकडून प्रयत्न केले जातील, असे आश्वासन देण्यात आले. मात्र, नियमांचे उल्लंघन झाल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येईल, यावरही अधिकाऱ्यांनी ठाम भूमिका मांडली.

### रिक्षा थांबे वाढवण्याचा निर्णय

पनवेल परिसरात सध्या १३२ अधिकृत रिक्षा थांबे असून, ३१ हजारांहून अधिक रिक्षाचालक नोंदणीकृत आहेत. थांब्यांच्या कमतरतेमुळे निर्माण होणाऱ्या अडचणी लक्षात घेता, नवीन अधिकृत थांबे वाढवण्याचा निर्णय घेण्यात येणार असल्याचे संकेत देण्यात आले.

### रिक्षाचालकांच्या प्रमुख मागण्या

- अधिकृत रिक्षा नाके वाढवावेत.
- अंतरानुसार भाडे निश्चित करण्याच्या सूचना.
- रेल्वे स्थानक परिसरात ॲप-आधारित सेवांवर नियंत्रण आणावे.

या बैठकीस वाहतूक विभागाचे वरिष्ठ अधिकारी, आरटीओ प्रतिनिधी तसेच विविध रिक्षा युनियनचे पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने चालक उपस्थित होते.

# अशी ही साताऱ्याची तऱ्हा

ओळखीचा चोर जिवे न सोडी अशी मराठीत म्हण आहे. भाजपच्या रुपाने अखिल देश आणि महाराष्ट्र या म्हणीचा जिवंत प्रत्यय गेली काही वर्षे घेत आहे. संधी मिळताच या पक्षाने आपल्याच मित्र पक्षांचे हात तोडायला किंवा प्रसंगी गळा दाबायलाही कमी केलेले नाही. पंजाबात अकाली दल, तमिळनाडूमध्ये जयललितांचा अण्णा द्रमुक या पक्षांची भाजपसोबत गेल्यानंतर वाताहात झाली आणि आज भाजप त्यांच्यावरच चोची मारत आहे. महाराष्ट्रात छोटा भाऊ म्हणत म्हणत एक दिवस भाजपने ठाकरे सेनेलाच खलास करण्याचे कसे डावपेच आखले व तडीला नेले हे आपण पाहत आहोत. आता ठाकरे सेनेशी दगाबाजी करून सत्तेची फळे चाखणाऱ्या शिंदे सेनेला भाजपचा हाच अनुभव येऊ लागला आहे. भाजपला राज्यात सत्तेसाठी आता शिंदेसेनेची गरज उरलेली नाही. उलट अनेक ठिकाणी त्यांचा अडथळाच होत आहे. राज्यात व देशात भाजपच्या नावाने सत्ता येत असताना शिंदे सेनेला त्याची फळे का मिळावीत असे भाजपवाल्यांना गेल्या विधानसभेपासून प्रकर्षाने वाटू लागले आहे. ते क्रमाक्रमाने शिंदे सेनेला खच्ची करणार हे तेव्हाच या स्तंभातून आम्ही म्हटले होते. त्याची स्पष्ट उदाहरणे आता समोर येऊ लागली आहेत. सातारा जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत शुक्रवारी जे काही घडले त्यावरून शिंदे सेनेला संपवा असा स्पष्ट फतवा वरून आलेला दिसतो आहे. गंमत म्हणजे त्यापूर्वी दोनच दिवस आधी एकनाथ शिंदे यांनी दिल्लीत जाऊन नरेंद्र मोदी यांच्याशी दीड तास चर्चा केली होती. एकीकडे मोदींनी शिंदे यांना भेट द्यायची, त्या जोरावर आपले दिल्लीशी किती चांगले संबंध आहेत याच्या बढाया शिंदे यांनी मारायच्या आणि दुसरीकडे भाजपने त्यांचे पंख छाटण्याचे उद्योग करायचे असा हा सर्व प्रकार आहे. मोदी किंवा शाह हे अजूनही आपल्या पाठीशी उभे आहेत असे शिंदे यांना वाटत असेल तर त्यांच्या भाबडेपणाची कमाल म्हणावी लागेल.

## शिंदे गटाचे खच्चीकरण

साताऱ्यामध्ये शिंदे गट व राष्ट्रवादी हे मैत्रीत होते. त्यांनी भाजपविरुध्द निवडणूक लढवली होती. साताऱ्यातील जयकुमार गोरे हे देवेंद्र फडणवीसांच्या जवळचे असून सध्या मोठे प्रस्थ झाले आहे. एकीकडे राष्ट्रवादी आणि दुसरीकडे शिंदे गट यांना शह देण्याचे काम त्यांच्याकडे आहे. सोलापूरचे पालकमंत्री म्हणून तिकडेही अजितदादांच्या गटाला संपवण्याची जबाबदारी त्यांच्यावर आहे. साताऱ्यात काँग्रेसच्या खालोखाल एकेकाळी शिवसेनेचा दबदबा होता. साताऱ्यातून उदयनराजे वगैरे सेनेच्या तिकिटावर निवडून गेले होते. सेना फुटल्यानंतर शंभूराज देसाई वगैरे बरेच आमदार शिंद्यांकडे गेले. त्यात खुद्द शिंदे यांचे मूळ गाव महाबळेश्वरजवळ असल्याने आणि या भागातील जमिनींमध्ये शिंदे आणि मंडळींना मोठा रस असल्याने त्यांनी सातारा व कोल्हापूर भागात अधिक लक्ष घातले. त्यातच राष्ट्रवादीमध्ये फूट पडून बहुतेक आमदार अजितदादांकडे गेले. त्यामुळे राष्ट्रवादीची शक्ती कमी झाली व शिंदे गटाचे फावले. यंदा जिल्हा परिषद निवडणुकीत ६५ पैकी निवडणूकपूर्व आघाडी केलेल्या राष्ट्रवादीच्या २० व शिवसेनेच्या १५ जागा होत्या. त्यामुळे त्यांचा अध्यक्ष निवडून यायला हवा होता. भाजपच्या २७ जागा होत्या. पण युतीला आपल्या उमेदवारांची खात्री वाटत नव्हती. भाजप फोडाफोडी करील असा त्यांना संशय होता. त्यामुळे गेले तब्बल महिनाभर या विजयी सदस्यांना भारतभर थंड हवेच्या ठिकाणी फिरवण्यात आले. तरीही अखेर निवडणुकीच्या दिवशी भाजपने करायचे ते केलेच. त्याने पाच सदस्य फोडले आणि भाजपच्या प्रिया शिंदे या अध्यक्ष म्हणून निवडून आल्या. त्यातही तिढा असा आहे की, प्रिया शिंदे या कोरेगावचे शिंदे गटाचे आमदार महेश शिंदे यांच्या पत्नी आहेत. महेश शिंदे हे गेल्या काही दिवसांपासून उघडपणे मोदी व फडणवीस हेच आपले नेते आहेत असे म्हणत आहेत. राष्ट्रवादीसोबत शिंदे गटाने युती करणे आपल्याला मंजूर नाही असा पवित्रा त्यांनी घेतला आहे. अशा घरभेद्यांमुळेच शिंदे गटाला विजयाची खात्री नव्हती. त्यामुळेच यांचे आमदार जसे गुवाहाटीला जाऊन बसले होते तसे यांचे सदस्य दूर राज्यात जाऊन लपले होते. पण तरीही भाजपने करायचे ते केलेच.

## सरकारी यंत्रणेचा वापर

निवडणुकीच्या दिवशी तर चक्क हाणामाऱ्या झाल्या. शिंदे गटाचे मंत्री शंभूराज देसाई व राष्ट्रवादीचे मकरंद पाटील हे आपल्या सदस्यांना मतदानाच्या ठिकाणी घेऊन येत असताना त्यांनाच पोलिसांनी धक्काबुक्की केली. त्यात शंभूराज यांच्या हाताला दुखापत झाली व रक्त येऊ लागले. या राज्याच्या मंत्र्यांवर फडणवीसांच्या अखत्यारीतील पोलिस हात उचलत असतील तर राज्यातील राजकारण कोणत्या थराला गेले आहे याची कल्पना यावी. विशेष म्हणजे राष्ट्रवादीचे दोन सदस्य मतदानाला येऊ नयेत म्हणून त्यांच्यावर अपहरणाचे गुन्हे दाखल करण्यात येऊन त्यांना जिल्हा परिषदेच्या आवारातच अटक करण्यात आली. हे सर्व जिल्हा पोलिस प्रमुख व जिल्हाधिकाऱ्यांच्या सहमतीशिवाय झाले असणे शक्य नाही. याचाच अर्थ हा खूप वरच्या पातळीवर शिजलेला सर्व कट होता. सोमवारी विधिमंडळात हा विषय गाजला. शंभूराज देसाई यांनी तर शुक्रवारपासूनच भाजपवर टीका केली होती. आता नीलम गोऱ्हे यांच्यामार्फत साताऱ्याचे पोलिस प्रमुख तुषार दोषी यांचे निलंबन करायला लावून शिंदे गटाने मनाचे समाधान करून घेतले आहे. पण ते निलंबन टिकणारे नाही. देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकाराच्या चौकशीचे आश्वासन दिले आहे. पण मुळात फोडाफोडी, पळवापळवी आणि मतदानाच्या वेळची हाणामारी हे सर्व नियोनबध्द रीतीने झालेले दिसते व त्यात सरकारी यंत्रणेचा पुरेपूर वापर दिसतो. अशा वेळी त्याच सरकारी यंत्रणेचे प्रमुख देवेंद्र काय चौकशी करणार हे कोणालाही कळेल. आता शिंदे सेना व राष्ट्रवादी यांनी कितीही कंठशोष केला वा हे प्रकरण न्यायालयात नेले तरी भाजप त्यांना दाद देईल असे दिसत नाही. यापूर्वी महापालिका निवडणुकांच्या वेळी अजितदादांनी भाजपवर टीका केल्यानंतर लगेचच त्यांच्या प्रसिध्दी करणाऱ्या संस्थेच्या पुण्यातल्या कार्यालयाची सीआयडीच्या लोकांनी पाहणी केली होती. कालपरवा अशोक खरात प्रकरणात चाकणकरबाईंच्या फोटोंना प्रसिध्दी मिळेल असे पाहून त्यांना महिला आयोगाच्या प्रमुखपदावरून काढण्यात आले. त्या प्रकरणात एकनाथ शिंदे व त्यांचे माजी मंत्री दीपक केसरकर यांचे फोटो अधिक प्रसिध्द होतील याची काळजी घेतली जात आहेच. याचे राजकारण करू नका असे देवेंद्र काल नागपुरात म्हणाले. पण सरकारच्या कारवाईद्वारे त्यांनी भाजपचे इप्सित साध्य केले आहे. त्याच दरम्यान शिंदे गटाला साताऱ्यात दणका देऊन भाजपने त्यांना जणू आपल्या पायरीने राहायचे असा इशारा दिला आहे. शिंदे गटाची सगळी मस्ती ही भाजपच्या जिवावर होती. आता भाजपने हे सलाईन काढून घेतल्यानंतर त्यांचे काय होईल हे दिसेलच. आता ही साताऱ्याची तऱ्हा हळूहळू राज्यात इतरत्रही पाहायला मिळेल. राज्यात राजकारणाचा पुढचा टप्पा सुरू होतोय.

## विचार

# जगावर दीर्घकालीन युद्धाची सावली

***इराण-अमेरिकेतील संघर्ष केवळ शस्त्रांचा किंवा सामर्थ्याचा नाही, तर राजकारण, भू-राजनीती आणि जागतिक व्यवस्थेचा प्रश्न आहे. दीर्घकाळ चालणाऱ्या युद्धात कोणताही देश पूर्ण विजय मिळवत नाही. उलट, अशा संघर्षांमुळे प्रदेश अस्थिर होतो, अर्थव्यवस्था डळमळते आणि मानवी हानी वाढते. या संघर्षाचे खरे उत्तर रणांगणावर नसून कूटनीतीच्या मार्गात आहे. अन्यथा, एका दीर्घ खर्चिक युद्धाची सावली संपूर्ण जगावर पडू शकते.***



प्रा. जयसिंग यादव

इराण आणि अमेरिका यांच्यात वाढत चाललेला संघर्ष केवळ दोन राष्ट्रांमधील लष्करी चकमकींपुरता मर्यादित नाही. या संघर्षात दोन्ही बाजूंनी लढाई दीर्घकाळ सुरू ठेवण्याचा व्यक्त केलेला निर्धार, त्यामागील सामरिक गणित, भूतकाळातील अनुभव आणि जागतिक परिणाम यांचा विचार केल्यास हा प्रश्न केवळ प्रादेशिक रहात नाही, तर संपूर्ण जगाच्या स्थैर्यावर परिणाम करणारा ठरतो. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आपल्या देशाकडे प्रचंड शस्त्रसाठा असल्याचा दावा करत युद्ध दीर्घकाळ चालवण्याची क्षमता असल्याचे संकेत दिले आहेत. दुसरीकडे, इराणनेही किमान सहा महिने युद्ध सुरू ठेवण्याचा इशारा दिला आहे. या दोन घोषणांमधून स्पष्ट होते की संघर्ष तात्पुरता किंवा मर्यादित राहील, अशी अपेक्षा करणे अवास्तव ठरू शकते. आधुनिक युद्धात निर्णायक विजय पटकन मिळत नाही; उलट दीर्घकालीन संघर्ष हीच अधिक सामान्य बाब बनली आहे. लष्करी शक्तीच्या दृष्टीने पाहता अमेरिका जगातील सर्वात सामर्थ्यशाली राष्ट्र मानले जाते. तिच्याकडे अत्याधुनिक हवाई दल, नौदल, क्षेपणास्त्र तंत्रज्ञान आणि जगभर पसरलेले लष्करी तळांचे जाळे आहे. याउलट इराणकडे अमेरिकेसारखी प्रचंड पारंपरिक लष्करी क्षमता नसली, तरी त्याने असिमित युद्धतंत्र विकसित केले आहे. बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे, ड्रोन तंत्रज्ञान, प्रादेशिक मित्रगट आणि समुद्री मार्गांवर प्रभाव टाकण्याची क्षमता या माध्यमातून तो आपल्या तुलनेने कमी साधनसामग्रीतूनही मोठ्या शक्तीला आव्हान देऊ शकतो. म्हणूनच या संघर्षात सरळ लष्करी तुलना केल्यास अमेरिका वरचढ वाटते; पण दीर्घकाळ चालणाऱ्या संघर्षात इराणची प्रतिकारक्षमता दुर्लक्षित करता येत नाही.

अमेरिकेच्या लष्करी इतिहासाकडे पाहिले असता एक महत्त्वाची बाब लक्षात येते. प्रचंड शक्ती असूनही तिला काही वेळा तुलनेने लहान किंवा कमी शक्तिशाली राष्ट्रांविरोधात अपेक्षित यश मिळालेले नाही. याचे सर्वात मोठे उदाहरण म्हणजे व्हिएतनाम युद्ध. तांत्रिक आणि लष्करी वर्चस्व असूनही अमेरिकेला दीर्घकाळ चाललेल्या संघर्षानंतर माघार घ्यावी लागली. त्याचप्रमाणे अफगाणिस्तानमध्ये दोन दशके ठाण मांडूनही शेवटी अमेरिकेवर माघारीची नामुष्की ओढवली. ही उदाहरणे दर्शवतात, की आधुनिक युद्धात फक्त शस्त्रांची संख्या किंवा तांत्रिक प्राबल्य निर्णायक ठरत नाही, तर राजकीय इच्छाशक्ती, स्थानिक भूगोल, जनसमर्थन आणि दीर्घकालीन रणनीती हे घटक तितकेच महत्त्वाचे असतात. अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्ष दीर्घकाळ चालल्यास दोन्ही देशांना किंमत चुकवावी लागेल. अमेरिकेसाठी सर्वात मोठा प्रश्न आर्थिक आणि सामरिक संसाधनांचा असेल. जगभर अनेक लष्करी जबाबदाऱ्या सांभाळताना आणखी एक मोठा संघर्ष टिकवून ठेवणे हे तिच्यासाठी आव्हानात्मक ठरू शकते. इराणसाठीही परिस्थिती सोपी नाही. आंतरराष्ट्रीय निर्बंध, मर्यादित आर्थिक साधने आणि आधीच दबावाखाली असलेली अर्थव्यवस्था यामुळे दीर्घ युद्ध देशांतर्गत संकटे वाढवू शकते. म्हणजेच, या संघर्षात जिंकणारा कोणी असला, तरी तो पूर्णपणे निष्कलंक राहणार नाही. दोन्ही बाजूंना मोठी मानवी, आर्थिक आणि राजकीय किंमत मोजावी लागेल. या संघर्षाचा परिणाम केवळ मध्यपूर्वे पुरता मर्यादित राहणार नाही. विशेषतः ऊर्जा बाजारपेठेवर त्याचा मोठा प्रभाव पडू शकतो.

मध्यपूर्व हा तेलपुरवठा करणारा जगातील सर्वात महत्त्वाचा प्रदेश आहे. येथे अस्थिरता वाढल्यास जागतिक तेलदर वाढण्याची शक्यता असते. याचा थेट परिणाम जगातील अर्थव्यवस्थांवर होतो. याशिवाय जागतिक राजकारणातही नव्या समीकरणांची निर्मिती होऊ शकते. रशिया आणि चीन यासारखी राष्ट्रे या संघर्षाचा फायदा घेऊन आपले सामरिक हितसंबंध मजबूत करण्याचा प्रयत्न करू शकतात. युक्रेन दीर्घकाळापासून रशियाच्या तुलनेत कमी शस्त्रे आणि कमी सैनिक असूनही कडवी लढत देत आहे. तरीदेखील शस्त्रांचा साठा आणि पुरवठा युद्धात महत्त्वाची भूमिका बजावतात. इस्त्रायल-अमेरिका आणि इराण यांच्यातील या संघर्षाच्या सुरुवातीलाच हल्ल्यांची गती अत्यंत वेगवान राहिली आहे. दोन्ही बाजू ज्या वेगाने शस्त्रांचा वापर करत आहेत, त्या वेगाने त्यांचे उत्पादन होत नाही. 'इन्स्टिट्यूट फॉर नॅशनल सेक्युरिटी स्टडीज' (आयएनएसएस) च्या अंदाजानुसार, अमेरिका आणि इस्त्रायल यांनी आतापर्यंत दोन हजारपेक्षा अधिक हल्ले केले आहेत. त्यात विविध प्रकारची शस्त्रे वापरण्यात आली आहेत. 'आयएनएसएस'च्या मते, इराणने आतापर्यंत ५७१ क्षेपणास्त्रे आणि १,३९१ ड्रोन डागले आहेत. त्यापैकी अनेक हवेतच पाडण्यात आले; मात्र या पातळीवरील लढाई दीर्घकाळ चालू ठेवणे दोन्ही बाजूंसाठी कठीण ठरणार आहे. इराणचे शाहीद १३६ ड्रोन कमी उंचीवर उडतात आणि ते रडारवर ओळखणे कठीण असते. हे ड्रोन सुमारे २५०० किलोमीटर अंतरावर लक्ष्य भेदू शकतात.

पाश्चिमात्य देशांच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे, की इराणकडून डागल्या जाणाऱ्या क्षेपणास्त्रांच्या संख्येत आधीच घट दिसू लागली आहे. युद्धाच्या पहिल्या दिवशी शेकडो क्षेपणास्त्रे डागली गेली होती. ती आता कमी झाली आहेत. युद्धापूर्वी असा अंदाज व्यक्त केला जात होता, की इराणकडे दोन हजारांपेक्षा अधिक कमी पल्ल्याच्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांचा साठा आहे. कोणताही देश आपल्या शस्त्रसाठ्याची अचूक संख्या सार्वजनिक करत नाही. कारण त्यामुळे शत्रूला माहिती मिळू शकते. अमेरिकेचे वरिष्ठ लष्करी अधिकारी डॅन केन यांनी सांगितले, की युद्धाच्या पहिल्या दिवसाच्या तुलनेत इराणकडून होणाऱ्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्र प्रक्षेपणात ८६ टक्के घट झाली आहे. 'युनायटेड स्टेट्स सेंट्रल कमांड' (सेंटकॉम) च्या मते, केवळ मागील २४ तासांमध्येच त्यात २३ टक्क्यांची घट नोंदवली गेली आहे. युद्धापूर्वी असेही मानले जात होते, की इराणने हजारो 'वन-वे अ‍ॅटॅक' प्रकारचे ड्रोन तयार करून ठेवले आहेत. त्याने रशियालाही हे तंत्रज्ञान दिले असून ते युक्रेनमध्ये त्याचा वापर करत आहेत. अमेरिकेनेही या डिझाइनची नक्कल केली आहे; मात्र जनरल केन यांच्या मते, संघर्षाच्या पहिल्या दिवसानंतर इराणच्या ड्रोन हल्ल्यांमध्ये ७३ टक्क्यांची घट झाली आहे. यावरून असे दिसते, की इराणला मोठ्या वेगाने हल्ले सुरू ठेवण्यात अडचणी येत आहेत. तथापि असेही शक्य आहे, की इराण आपला शस्त्रसाठा वाचवण्यासाठी जाणीवपूर्वक हल्ले कमी करत असावा; पण उत्पादन सुरू ठेवणे आता अधिक कठीण होऊ शकते, कारण अमेरिका आणि इस्त्रायलची लढाऊ विमाने आता इराणवर हवाई वर्चस्व प्रस्थापित करत आहेत.

इराणची बहुतेक हवाई संरक्षण व्यवस्था नष्ट झाली असून त्याची वायुसेना प्रभावी राहिलेली नाही. 'सेंटकॉम'च्या मते, युद्धाचा पुढील टप्पा आता इराणचे क्षेपणास्त्र आणि ड्रोन लाँचर, शस्त्रसाठे, शस्त्र उत्पादन कारखान्यांना लक्ष्य करण्यावर केंद्रित असेल. यामुळे अमेरिका आणि इस्त्रायलसाठी इराणची लढण्याची क्षमता कमकुवत करणे सोपे होऊ शकते; मात्र त्याचा संपूर्ण शस्त्रसाठा नष्ट करणे कठीण असेल. इराणचे क्षेत्रफळ फ्रान्सच्या तुलनेत जवळजवळ तीनपट मोठे आहे. त्यामुळे शस्त्रे जमिनीखाली लपवणे शक्य आहे. अलीकडील इतिहासाकडे पाहिले, तर केवळ हवाई हल्ल्यांद्वारे युद्ध पूर्णपणे जिंकणे शक्य होत नाही, असे दिसते. तीन वर्षांहून अधिक काळ चाललेल्या तीव्र बॉम्बहल्ल्यांनंतरही इस्त्रायलला गाझा पट्ट्यात 'हमास'ला पूर्णपणे नष्ट करता आलेले नाही. त्याचप्रमाणे येमेनमध्ये हुती बंडखोरही एका वर्षाच्या अमेरिकी बॉम्बहल्ल्यांनंतर टिकून राहिले. अमेरिकेकडे जगातील सर्वात शक्तिशाली सैन्य आहे. तिच्याकडे इतर कोणत्याही देशापेक्षा पारंपरिक शस्त्रांचा मोठा साठा आहे; मात्र अमेरिकी सैन्य प्रामुख्याने महाग आणि अत्यंत अचूक मार्गदर्शित शस्त्रांवर अवलंबून असते. त्यांचे उत्पादन मर्यादित प्रमाणात होते. ट्रम्प यांनी संरक्षण कंपन्यांची बैठक बोलावली आहे. त्यामुळे त्यांना उत्पादन वाढवता येईल. यावरून अमेरिकेच्या संसाधनांवरही काही प्रमाणात दबाव असल्याचे संकेत मिळतात. अमेरिका आता महागड्या आणि लांब पल्ल्याच्या 'टॉमहॉक क्रूज मिसाईल' ऐवजी तुलनेने स्वस्त शस्त्रांचा वापर करत आहे.

अमेरिकी वायुसेना आता 'जेडीएएम' बॉम्बचा वापर करत आहे. अमेरिका दर वर्षी सुमारे ७०० क्षेपणास्त्रे तयार करते. इराण सतत बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे डागत राहिला, तर हा मर्यादित साठा वेगाने कमी होऊ शकतो. अमेरिकेकडे सुमारे १६०० पॅट्रियट क्षेपणास्त्रांचा साठा असू शकतो; परंतु अलीकडील काळात तो कमी झाला असावा. ट्रम्प यांनी पॅट्रियट क्षेपणास्त्रांचा साठा कमी करण्याचा धोका स्वीकारल्यास अमेरिका इराणविरुद्धच्या युद्धात अधिक काळ टिकू शकते; मात्र त्यामुळे प्रशांत महासागर क्षेत्रातील संभाव्य संघर्षाचा धोका वाढू शकतो.

**(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)**

## चर्चा आजची

# अंधश्रद्धा अजूनही कायम



वैष्णवी वाडकर

आज आपण २१व्या शतकात जगत आहोत, जिथे विज्ञान, तंत्रज्ञान आणि शिक्षणाने भरपूर प्रगती केली आहे. मात्र, सध्या आजूबाजूला घडणाऱ्या घटनांकडे बघितल्यावर समजते की, एवढी प्रगती होऊन देखील माणूस कुठे तरी अधोगतीत अडकलेला आहे. 'कळतंय पण वळत नाही', अशी परिस्थिती सध्या आहे. महाराष्ट्रात सध्या एका भोंदू बाबाची चांगलीच चर्चा सुरु आहे. त्यांचे नाव कॅप्टन अशोक खरात असे असून त्यांच्यावर शंभरहुन अधिक महिला लैंगिक शोषण केल्याचा दावा केला जात आहे. आश्चर्याची बाब म्हणजे, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर या देखील अशोक खरात यांच्या सोबत काही छायाचित्रांमध्ये दिसून आल्याची चर्चा सुरू आहे. त्यामुळे या प्रकरणात त्यांच्या भूमिकेबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

नाशिकमधील कॅप्टन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भोंदूबाबाच्या प्रकरणाने पुन्हा एकदा समाजात अंधश्रद्धा अजूनही जिवंत असल्याची जाणीव करून दिली. कोणत्याही गोष्टीच्या दोन बाजू असतात, त्याचप्रमाणे जिथे श्रद्धा आहे तिथे अंधश्रद्धा आलीच. परंतु, श्रद्धा म्हणजे निस्वार्थ भक्ती आणि देवावर अतूट विश्वास. अंधश्रद्धा म्हणजे विचार न करता, प्रश्न न विचारता, कोणत्याही गोष्टीवर डोळेझाकपणे विश्वास ठेवण्याची मानसिकता आहे. ही मानसिकताच भोंदू बाबांसाठी मोठी शक्ती ठरते. जेव्हा एखादी व्यक्ती आयुष्यातील अडचणींनी त्रासलेली असते; तसेच नातेसंबंध, आरोग्य किंवा आर्थिक अडचणीत तेव्हा ती कोणत्याही आधाराच्या शोधात असते. अशा प्रकारच्या घटनांमध्ये काही लोक स्वतःला देवदूत, साधू किंवा चमत्कार करणारे अगदी देवाचा अवतार म्हणून सादर करतात आणि लोकांच्या भावना, भीती व अडचणींचा गैरफायदा घेतात. विशेषतः महिलांना लक्ष्य करून त्यांच्यावर मानसिक, आर्थिक आणि कधी कधी शारीरिक शोषणही केले जाते. शिक्षण घेतलेले, सुजाण समाजातले नागरिकही अशा जाळ्यात अडकतात ही गोष्ट अधिक धक्कादायक आहे. शिक्षण असूनही जर तर्कशुद्ध बुद्धिमत्ता त्या माणसात नसेल तर मग ते शिक्षण अपुरे आहे, असेच म्हणावे लागेल. जेव्हा एखाद्या व्यक्तीच्या आयुष्यात अचानक अडचणी येतात, तेव्हा त्याला त्यावर लगेच उपाय हवा असतो. अशा वेळी भोंदू बाबा आपले कथित चमत्कार दाखवण्यासाठी नेहमीच तयार असतात. मात्र, अशा परिस्थितीत तर्कशुद्ध मार्ग निवडणे हीच खरी शहाणपणाची गोष्ट आहे. कोणत्याही व्यक्तीवर आंधळा विश्वास ठेवणे, वैयक्तिक किंवा संवेदनशील माहिती सहजपणे शेअर करणे टाळले पाहिजे. नागरिकांनीही अशा घटनांकडे केवळ बातमी म्हणून न पाहता त्यातून शिकण्याची गरज आहे. महाराष्ट्र ही संतांची भूमी मानली जाते. संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर यांसारख्या महान संतांनी समता, निस्वार्थ भक्ती आणि संयम यांची शिकवण दिली. त्यांच्या विचारांमध्ये साधेपणा, प्रामाणिकपणा आणि तर्कशुद्धता होती. परंतु, दुसरीकडे आज काही स्वयंघोषित देवाचे अवतार लोकांना अंगठ्या, ताईत, माळा, विभूती देऊन खोट्या आश्वासनांच्या जाळ्यात अडकवतात. आज हे घाला, उद्या चमत्कार घडेल, अशा भ्रमात लोकांना ठेवून त्यांची फसवणूक केली जाते. हीच खरी दुःखाची बाब आहे. ज्या भूमीने संतांची शिकवण दिली, त्याच भूमीत अंधश्रद्धेचा असा बाजार मांडला जात आहे. श्रद्धा आणि अंधश्रद्देतील फरक ओळखण आज अत्यंत आवश्यक आहे. म्हणूनच, प्रत्येकाने जागरूक राहून, विचारपूर्वक निर्णय घेणं आणि कोणत्याही गोष्टीवर आंधळा विश्वास न ठेवणं हीच काळाची खरी गरज आहे.

अंधश्रद्धा विचारांचा खेळ आहे आणि तो खेळ माणूस स्वतःच तयार करत असतो. कोणतीही गोष्ट करताना विश्वास खूप महत्वाच असतो आणि आपण खूप विचार करून एखाद्याव्यक्ती वर विश्वास ठेवतो. अंधश्रद्धा पसरवणारे भोंदू बाब बोलण्यात फेरफार करण्यात हुशार असतात आणि त्यामुळेच माणूस त्यांच्या जाळ्यात सहज अडकतो. मात्र, अशा वेळी सहज स्वतःची भुरळ पडून न घेता तर्कवितर्क लावणे आवश्यक असते. आजच्या काळात माहितीची कमतरता नाही, परंतु योग्य विचार करण्याची कमतरता आहे. आपण ऐकतो, पाहतो, पण विचार करत नाही. कोणीतरी सांगितले म्हणून, किंवा सगळेच करतात म्हणून आपणही त्याच मार्गाने जातो आणि हळूहळू, आपली स्वतःची विचार करण्याची क्षमता कमी होत जाते. खरे तर, प्रत्येक माणसाकडे प्रश्न विचारण्याची ताकद असते. परंतु, समाज, भीती आणि परंपरा यांच्या दबावाखाली आपण ती ताकद वापरत नाही आणि जिथे प्रश्न थांबतात, तिथे अंधश्रद्धा सुरू होते.

आज शासनाकडून अंधश्रद्धा निर्मूलनासाठी विविध योजना, कायदे आणि जनजागृती मोहिमा राबवल्या जात आहेत. लोकांना योग्य आणि वैज्ञानिक विचारसरणीकडे वळवण्याचा प्रयत्न सातत्याने होत आहे. मात्र, केवळ सरकारच्या प्रयत्नांवर अवलंबून राहून अंधश्रद्धा संपणार नाही. कारण अंधश्रद्धा ही बाहेरची गोष्ट नसून ती माणसाच्या विचारांमध्ये लपलेली असते. जोपर्यंत प्रत्येक व्यक्ती स्वतः विचार करायला शिकत नाही, तोपर्यंत कोणतीही मोहिम पूर्णपणे यशस्वी होऊ शकत नाही.

## लोकसंसद

### स्ट्रॉबेरीचा प्रवास, महाबळेश्वर ते गडचिरोली!

महाराष्ट्राचे नंदनवन म्हटले की पटकन आठवण येते ती म्हणजे सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर या थंड हवेच्या ठिकाणाची आणि महाबळेश्वर म्हणजे स्ट्रॉबेरी हे समीकरणही प्रसिद्ध आहे. येथील अनुकूल थंड हवामानात आणि लोहयुक्त लाल मातीत उगवणाऱ्या रसरशीत स्ट्रॉबेरीच्या गोडवा जगभर पसरला आहे. परंतु याच स्ट्रॉबेरीने महाबळेश्वरपासून ९६५ किमी दूर अंतरावर असलेल्या गडचिरोली जिल्ह्यातील मुलचेरा तालुक्यात उगवण्याचा पराक्रम केला आहे. अर्थात त्याचे सर्व श्रेय मुलचेरा तालुक्यातील शेतीत विविध प्रयोग करू पाहणाऱ्या तरुण शेतकऱ्यांना असून त्यांनी उष्ण कटिबंधीय प्रतिकूल हवामानातही स्ट्रॉबेरीची आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत, क्लस्टर पद्धतीने लागवड करून अफाट मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर स्ट्रॉबेरीचे उत्पादन यशस्वी करून दाखवले आहे. विशेष म्हणजे गडचिरोलीच्या या शेतकऱ्यांनी स्ट्रॉबेरी पिकवण्यापूर्वी ती कधी पाहिलीही नव्हती आणि हे फळ नेमके कसे असते हे जाणून घेण्यासाठी त्यांना इंटरनेटवर स्ट्रॉबेरीचा शोध घ्यावा लागला. आज तीच स्ट्रॉबेरी जिल्ह्याच्या दुर्गम भागातील आठवडी बाजारात आनंदाने विकली जात आहे. नक्षलवादी-माओवादी कारवायांपासून हळूहळू मुक्त होत पोलादासारख्या कारखान्यांमुळे विकासाच्या वाटेवर जाणाऱ्या गडचिरोली जिल्ह्यात स्ट्रॉबेरीच्या उत्पादनामुळे तेथील शेतकऱ्यांना उत्पन्नाचा एक उत्तम पर्याय उपलब्ध झाला असून स्थानिक अर्थव्यवस्थेला अधिक चालना मिळणार आहे.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

## दिनविशेष

# जागतिक क्षयरोग दिन

दरवर्षी २४ मार्च हा दिवस जागतिक क्षयरोग दिन म्हणून पाळला जातो. कारण, तब्बल १४३ वर्षांपूर्वी म्हणजे २४ मार्च १८८२ या दिवशी डॉ. रॉबर्ट कॉख यांनी क्षयरोगाला कारणीभूत असणाऱ्या 'मायकोबॅक्टेरियम ट्यूबरक्युलोसिस' या जीवाणूचा शोध लावला होता.

क्षयरोग म्हणजे टीबी-ट्यूबरक्युलोसिस. जागतिक क्षयरोग दिनानिमित्त जगभर क्षयरोगाबाबत प्रबोधन केले जाते.

दरवर्षी जवळपास एक कोटी व्यक्तींना क्षयाचा संसर्ग होतो. क्षयरोगामुळे दरवर्षी मृत्युमुखी पडणाऱ्या रुग्णांची संख्या अनेक लाखांत आहे. भारत, पाकिस्तान, चीन, इंडोनेशिया, फिलिपाईन्स, नायजेरिया आणि दक्षिण आफ्रिका या देशांत क्षयरोगाचे सर्वाधिक रुग्ण आढळतात जागतिक आरोग्य संघटनेने क्षयरोग नियंत्रणासाठी 'क्षयरोग संपवूया' (एंड टीबी स्ट्रॅटेजी) हे अभियान राबविले आहे. यात इ.स. २०३० पर्यंत क्षयरोगाचे आणि क्षयरोगामुळे होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण लक्षणीयरीत्या घटविण्याचे उद्दिष्ट आहे. वैद्यकीय तंत्रज्ञानात नेत्रदीपक प्रगती झाली असली, तरी औषध प्रतिरोधक क्षयरोग (मल्टिड्रग रेझिस्टंट टीबी आणि एक्सटेंसिव्हली ड्रग रेझिस्टंट टीबी) या प्रकारच्या क्षयरोगांवर पूर्णतः मात करणे शक्य झाले नाही. कारण, क्षयरोगावर मात करण्यासाठी औषधोपचाराबरोबर, आहार, विहार, विश्रांती आणि निरोगी जीवनशैलीची गरज असते. क्षयरोग हा इतिहास काळापासून अस्तित्वात असला, तरी तो अजून इतिहासजमा झालेला नाही. क्षयरोग हा मुख्यत्वेकरून फुफ्फुसाला (पल्मोनरी टीबी) होत असला, तरी नख, केस आणि दात वगळता शरीरातील कोणत्याही अवयवांना (एक्स्ट्रापल्मोनरी टीबी) होऊ शकतो. क्षयरोग हा हवेद्वारे माध्यमातून पसरणारा आजार असला, तरी तो पाण्याद्वारेसुद्धा पसरू शकतो. एखादी क्रियाशील क्षयरोग असलेली व्यक्ती जेव्हा खोकते, शिकते, मोठ्याने बोलते किंवा गाते, तेव्हा नाका-तोंडातून बाहेर पडणारे बारीक तुषार आणि थेंब याद्वारे क्षयाचे जंतू आजूबाजूला पसरतात. जेव्हा निरोगी व्यक्ती ही हवा नाकावाटे आत घेते, तेव्हा हे जंतू फुफ्फुसात प्रवेशून क्षयरोग उद्भवतो. क्षयाचा संसर्ग अनेकदा दीर्घकाळ संपर्कातून होतो. दाटीवाटीची वस्ती, वायुविजनाचा अभाव, निकृष्ट राहणीमान असलेल्या ठिकाणी संसर्गाची शक्यता अधिक असते. प्रत्येक नागरिकांनी क्षयरोगाची लक्षणे ओळखायला हवीत. तीन आठवड्यांहून अधिक काळ असलेला खोकला, खोकल्यातून रक्त पडणे, संध्याकाळी बारीक ताप येणे, रात्री घाम येणे, भूक मंदावणे, वजन कमी होणे, अशक्तपणा आणि थकवा जाणवणे ही क्षयरोगाची प्रमुख लक्षणे आहेत; पण बाधित अवयवांनुसार इतर लक्षणे दिसू शकतात. .मानेवर गाठी दिसणे, डोके दुखणे, छातीत दुखणे, पाठ दुखणे, जुलाब होणे इ. क्षयरोगाचा एक प्रकार सहजपणे व्यक्त होत नाही. त्याची कोणतीही लक्षणे नसतात. त्याला लपलेला क्षयरोग असे म्हणतात. काही कारणांमुळे जेव्हा रोगप्रतिकारक्षमता कमी होते, तेव्हा हा क्षयरोग व्यक्त होतो. जसे की मधुमेह, एच. आय. व्ही. एड्स किंवा कर्करोगासारखा आजार. क्षयरोगाचे उच्चाटन करण्यासाठी जागतिक स्तरावर जोरदार प्रयत्न सुरू असले, तरी गरिबी, अज्ञान, बेरोजगारी, प्रचंड लोकसंख्येमुळे निकृष्ट दर्जाचे राहणीमान, आरोग्याच्या मूलभूत सुविधांची वानवा, सकस आहाराची कमतरता, तंबाखू-दारू यासारखी व्यसनाधीनता अशा कारणांमुळे रोगप्रतिकारक क्षमता कमी होते आणि क्षयरोगाला आमंत्रण मिळते.

अनेक जण आपल्या तक्रारींकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे क्षयरोगाचे निदान उशिरा होते. क्षयरोगावरील औषधांच्या अयोग्य, अपुऱ्या किंवा अनियमित वापरामुळे एखाद्या व्यक्तीचा क्षयरोग वेळेत आणि संपूर्ण बरा होत नाहीच शिवाय अशा व्यक्तीमध्ये औषधाला दाद न देणारा क्षयरोग निर्माण होऊ शकतो. आज क्षयरोगाचे जलद निदान करण्यासाठी जीन एक्स्पर्ट आणि टू नेटसारखी तंत्रे उपलब्ध झाली आहेत. यामुळे औषध-प्रतिरोधक क्षयरोगाची माहिती त्वरित मिळते आणि लगेच उपचार सुरू करता येतात. या सर्व गोष्टी सर्वांनी समजून घेतल्या, तर क्षयरोगाचा प्रसार आपण थांबवू शकतो.

# भुयारी मेट्रोत नेटवर्कचा अभाव

## प्रवाशांची गैरसोय; कंत्राटदार नियुक्तीचा घोळ कायम



| मुंबई | प्रतिनिधी |

मुंबईकरांना आरामदायी प्रवासाचे स्वप्न दाखवून प्रवासी सेवेत दाखल झालेल्या भुयारी मेट्रो मार्गिकेवर मोबाईल नेटवर्कचा प्रश्न गंभीर बनला आहे. आरे जेव्हीएलआर ते कफ परेडपर्यंतच्या मार्गिकेवर आता मोबाईल नेटवर्क पूर्णपणे गायब झाले आहे. त्यामुळे प्रवाशांची गैरसोय झाली आहे. नेटवर्कसाठी पंत्राटदार नियुक्तीचा घोळ कायम असल्यामुळे नियमित प्रवासी मेट्रो प्रशासनाच्या कारभारावर नाराजी व्यक्त करीत आहेत.

मेट्रो-३ मार्गिकेच्या आरे जेव्हीएलआर ते वांद्रे-कुर्ला संकुल आणि तेथून पुढे आचार्य अत्रे चौक स्थानकापर्यंतच्या दोन टप्प्यांत शुक्रवारपर्यंत बीएसएनएल आणि व्होडाफोनचे मोबाईल नेटवर्क होते. बीएसएनएलपाठोपाठ व्होडाफोनचेही नेटवर्क बंद झाल्यामुळे संपूर्ण मार्गिका आता मोबाईल नेटवर्कबाहेर गेली आहे. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसी) दूरसंचार पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी परदेशी कंपनीशी केलेले कंत्राट रद्द केले आणि नव्या कंत्राटदाराची नियुक्ती करण्यासाठी नुकतीच निविदा जारी केली आहे. मात्र नियुक्तीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत प्रवाशांना मोबाईल नेटवर्कशिवाय भुयारी मेट्रोचा प्रवास करावा लागणार आहे.

### प्रवासी संख्या घटण्याची शक्यता

भुयारी मेट्रो मार्गिका पूर्ण क्षमतेने सुरू झाल्यानंतर सुरुवातीच्या काळात प्रवाशांचा मोठा प्रतिसाद लाभला. मात्र तिकीट दर जास्त असल्यामुळे पुढील काळात प्रवासी संख्या अपेक्षेप्रमाणे वाढली नाही. ऑक्टोबर २०२५ मध्ये ३८ लाखांहून अधिक प्रवाशांनी भुयारी मेट्रो मार्गिकेचा वापर केला होता. मात्र तीन महिन्यांत एकूण प्रवासी संख्या केवळ ४६.५६ लाखांवर पोहोचली. आता मोबाईल नेटवर्कचा गंभीर प्रश्न निर्माण झाल्याने भुयारी मेट्रोची प्रवासी संख्या घटण्याची शक्यता वाहतूकतज्ज्ञांकडून वर्तवली जात आहे.

ही मार्गिका पूर्ण क्षमतेने सेवेत दाखल होऊन सहा महिने झाले. त्यानंतरही मोबाईल नेटवर्कचा प्रश्न सोडवण्यात एमएमआरसीला यश आलेले नाही. त्यामुळे नियमित प्रवाशांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण आहे.

दरम्यान, आपत्कालीन संपर्क सुविधा यांसह सर्व महत्त्वाच्या सुरक्षा प्रणाली नेहमीप्रमाणे कार्यरत आहेत, असे एमएमआरसीने स्पष्ट केले. तसेच, नेटवर्क सेवा शक्य तितक्या लवकर सुरू करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. मागील कंत्राटदाराने करारातील अटी पूर्ण केल्या नसल्यामुळे त्यांची सेवा समाप्त केली आहे. नवीन सेवा प्रदाता नियुक्तीची प्रक्रिया लवकरच सुरू केली जाईल, असे एमएमआरसीच्या अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

# वाघ्रणमध्ये श्री साई भंडारा उत्सवाची तयारी

| वाघ्रण | प्रतिनिधी |

अलिबाग तालुक्यातील वाघ्रण येथे श्री साई भंडारा उत्सवाची जोरदार तयारी असल्याचे साईमंदीर व परिसरात पहायला मिळत आहे. गुरुवार दि.२६ आणि २७ मार्च २०२६ रोजी होत असल्याच्या या भंडारा उत्सवासाठी मंदीर सजवताना आणि मंडप परीसरात रोशनाई करताना साईप्रेम मित्र मंडळ वाघ्रण-खार पेढांबे आणि श्री साईगणेश पालखी पदयात्रा मंडळाचे कार्यकर्ते कार्यकते साईभक्त दिसत आहेत. या उत्सवानिमित्त सालाबादप्रमाणे कार्यक्रम होणार आहेत. भंडारा उत्सवाचे यंदाचे २८वे वर्ष असून २६ मार्चला सकाळी ४ ते ५ अभिषेक, काकड आरती होईल. त्यानंतर मंदिर साई भक्तांसाठी मंदीर दर्शनास खुले असेल. १० नंतर श्री सत्यनारायण महापूजा त्याचबरोबर १ ते ३ या वेळात श्री साईबाबा भंडारा महाप्रसाद तर रात्री साई पालखी सोहळा होणार पार पडणार आहे.



दुसऱ्या दिवशी महिलांना दुपारी हळदी कुंकु कार्यक्रम व मनोरंजन कार्यक्रम आयोजित केले आहेत. मंदिराला फुलांची आणि रोशनाईची सजावट सुसज्ज मंडप सजावट, बैठक व्यवस्था, मंच आदी तयारी होत आहे. तरी सर्व भक्तांनी तिर्थ प्रसाद तसेच महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# सामाजिक ऐक्याच्या वातावरणात ईद साजरी



| बोर्लीपंचतन | प्रतिनिधी |

श्रीवर्धन तालुक्यातील दिवेआगर व बोर्ली पंचतन परिसरात रमजान ईद पारंपरिक उत्साहात आणि सामाजिक ऐक्याच्या वातावरणात साजरी करण्यात आली. महिनाभर पाळलेल्या उपवासानंतर चंद्रदर्शन होताच ईदचा सण साजरा करण्यात आला.

पहाटेपासूनच मशिदी आणि मोहल्ल्यांमध्ये मुस्लिम बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सामूहिक नमाज अदा केली. नमाजानंतर एकमेकांना ईद मुबारकच्या शुभेच्छांची देवाणघेवाण करत आनंद व्यक्त करण्यात आला. या सणानिमित्त घराघरांत पारंपरिक पदार्थांची रेलचेल पाहायला मिळाली. विशेषतः 'सांधन', 'उकरा' यांसारखे कोकणी खास पदार्थ तसेच शीरखुर्मा, सेवई आणि बिर्याणी यांचा आस्वाद घेतला गेला. अनेक ठिकाणी विविध धर्मीय नागरिक एकत्र येऊन सण साजरा करत असल्याचे चित्र दिसून आले, जे कोकणच्या सामाजिक एकोप्याचे प्रतीक ठरले. सणानिमित्त दिवेआगर व बोर्ली पंचतन शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनी नव्या कपड्यांत सणाचा आनंद लुटला. बाजारपेठा आणि परिसरात दिवसभर चैतन्याचे वातावरण होते.

ईदनिमित्त सुट्ट्या असल्यामुळे दिवेआगर समुद्रकिनाऱ्यासह श्रीवर्धनमधील पर्यटनस्थळांवर पर्यटकांची गर्दी पाहायला मिळाली. स्थानिक व्यावसायिकांसाठी हा काळ आर्थिकदृष्ट्या दिलासादायक ठरत आहे.

दिवेआगर व बोर्ली पंचतन परिसरातील रमजान ईद सणाने केवळ धार्मिक उत्सवाची मर्यादा ओलांडत सामाजिक सलोखा, बंधुभाव आणि कोकणी संस्कृतीचे जतन यांचा प्रभावी संदेश दिला आहे.

# फेस्कॉन जेष्ठाच्या उन्नतीसाठी झटणारी संस्था

## कोकण विभाग अध्यक्ष विलास काळे यांचे प्रतिपादन



| रेवदंडा | प्रतिनिधी |

फेस्कॉन ही संस्था जेष्ठांच्या उन्नतीसाठी सन १९८० सालापासून झटणारी संस्था आहे. जेष्ठांच्या विविध समस्या तसेच मदतीसाठी सदैव सोडविण्यासाठी ही संस्था तत्पर असते, असे प्रतिपादन जेष्ठ संघटनेचे कोकण विभागीय अध्यक्ष विलास काळे यांनी केले. यावेळी त्यांनी जेष्ठाच्या कोकण प्रदेश अध्यक्ष म्हणून कामाचा ताण पडत असल्याने त्यांची विभागणी करून जिल्हास्तरीय प्रदेश अध्यक्ष नेमण्यात यावे, जेणेकरून जेष्ठ नागरिक संघाचे विविध प्रश्न तत्परतेने सोडविता येतील व सुविधा निर्माण करता येतील, अशी सुचना त्यांनी मांडली.

चौल श्रीगणेश मुखरी मंदिराचे सभागृहात चौल जेष्ठ नागरिक संघाचा वर्धापन व रौप्य महोत्सव सांगता दिन सांगता दिन शनिवारी (दि.२१) सायकांळी आयोजित करण्यात आला होता. यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी व्यासपिठावर अध्यक्षस्थानी जेष्ठ नागरिक संघटनेचे कोकण विभाग अध्यक्ष विलास काळे, जेष्ठ नागरिक संघाचे कोकण विभागीय सचिव दिपक करकरे, तसेच जेष्ठ नागरिक संघटना समन्वय समिती रायगड जिल्हा अध्यक्ष सुरेश पालकर तसेच चौल जेष्ठ नागरिक संघटना अध्यक्ष सतिश दत्तात्रेय मनोहर, उपाध्यक्ष दिपक सखाराम तळेकर, उषा वैदय, सचिव देवानंद दत्तात्रेय पोवळे, तसेच रौप्य महोत्सव समिती अध्यक्ष रोहिदास म्हात्रे, सचिव विनोद जाधव यांची उपस्थिती होती. तसेच मोठया संख्येने चौल जेष्ठ नागरिक संघटनेचे सदस्यांची उपस्थिती होती.

# सैन्य भरती मेळावा

**कोर्लई :** रायगड युवक फाउंडेशनतर्फे अलिबाग तालुक्यातील अदिवासी, ओबीसी समाजातील १०वी, १२वी पास, ८वी-९वी पास व १०वी नापास तसेच पेटी, बाजा, ढोलक, संगीतातील ईतर वाद्य वाजविणारी तरुणांसाठी भारतीय सैन्यात भरती मार्गदर्शन मेळावा आयोजित करण्यात आला आहे. हा मेळावा शनिवार दि.२८ मार्च रोजी वात्सल्य वृध्दाश्रम, गोशाळा, महादुनगर सांबरी, कुर्डुस जवळ येथे आयोजित करण्यात आला आहे. मार्गदर्शनास रायगड जिल्हा सैनिक बोर्ड अलिबागचे अधिकारी व तिन्ही दलाचे निवृत्त अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

# जल दिनानिमित्त जनजागृती रॅली

| पनवेल | प्रतिनिधी |

जागतिक जल दिनानिमित्त करंजाडे नोड परिसरात सिडको प्रशासनाच्या वतीने पाणी बचत व पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीत स्थानिक शाळांतील विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. यावेळी 'पाणी वाचवा, पर्यावरण वाचवा' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.

विद्यार्थ्यांनी विविध संदेश देणारे फलक हातात घेत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण केली. या उपक्रमात सिडकोचे अधिकारी, कर्मचारी, शिक्षक व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. पाण्याचे महत्त्व व त्याचे जतन करण्याची गरज याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.सध्याच्या वाढत्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर अशा उपक्रमांची गरज असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. पर्यावरण रक्षणासाठी प्रत्येकाने जबाबदारीने वागावे, असे आवाहनही करण्यात आले.

# महाआराध्य प्रतिष्ठानला समाजरत्न पुरस्कार



| माणगाव | प्रतिनिधी |

महाराष्ट्र पोलीस न्युज-२४ यांच्यातर्फे तृतीय वर्धापन दिनाचे औचित्य साधून सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात रायगड जिल्ह्यात नावलौकिक कमाविलेल्या महाआराध्य प्रतिष्ठानचा समाजरत्न पुरस्काराने सन्मान करण्यात आला. पुणे येथे रविवार दि.२२ मार्च रोजी झालेल्या भव्य दिव्य अशा कार्यक्रमात महाआराध्य प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रसाद धारिया व संस्थापक संचालिका अंकिता प्रसाद धारिया यांना आकर्षक सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

महाआराध्य प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रसाद धारिया, संचालिका अंकिता धारिया हे आपण समाजाचे काहीतरी देणेकरी लागतो, या उदात्त हेतूने आपल्या प्रतिष्ठानमार्फत विविध सामाजिक, शैक्षणिक उपक्रम सातत्याने राबवित असतात. त्यामुळे या प्रतिष्ठानचे नाव रायगड जिल्ह्यात सर्वदूर पोहचले आहे. या प्रतिष्ठानच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याची दखल महाराष्ट्र पोलीस न्युज-२४ यांनी घेऊन त्यांना समाजरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२४ मार्च

१) श्री. प्रभाकर विनायक दांडेकर
पोयनाड, २४-३-१९४०

२) श्रीम. सुनिता सुधाकर पतंगे
अलिबाग, २४-३-१९५३

३) श्रीम. आदिती मधुकर वैद्य
अलिबाग, २४-३-१९४१

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

## दीपक पाटील यांना राज्यस्तरीय पुरस्कार

**अलिबाग :** वाघ्रण येथील रायगड भूषण पत्रकार आणि साहित्य लेखक कवी दिपक यशवंत पाटील यांच्यासह सहा जणांना राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाले आहेत. पुरस्कारांचे वितरण २९ मार्च रोजी सकाळी ११ ते १ या वेळेत होणार आहेत. सामाजिक आणि साहित्य रत्न पुरस्कार देऊन स्पंदन फाऊंडेशन पुणेच्या वतीने हे पुरस्कार मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात येणार आहेत. यात सामाजिक कार्यकते जीवन पाटील, प्रणित म्हात्रे, रुपेश पाटील, जिवीता पाटील आणि सतीश म्हात्रे आदींचा समावेश आहे. या कार्यक्रमाचे आयोजन पुण्याच्या ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले सभागृहात करण्यात आले असल्याचे प्रसिद्धी पत्रकाद्वारे सर्वांना कळवण्यात आले आहे.

## वैभव तोडणकर यांना मातृशोक

**बोर्लीपंचतन :** श्रीवर्धन तालुक्यातील आदगाव येथील सुनिता सुधाकर तोडणकर (७७) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. बोर्ली पंचतन येथील हॉटेल वैभवचे मालक तसेच पत्रकार वैभव तोडणकर यांच्या



त्या मातोश्री होत. अत्यंत सोज्वळ, सात्विक व मनमिळाऊ स्वभावामुळे त्यांचे सर्वांशी स्नेहाचे संबंध जुळले होते. त्यांच्या निधनाने कुटुंबाने एक महत्त्वाचा आधारस्तंभ गमावला आहे. त्यांच्या पश्चात दोन कन्या, एक मुलगा, जावई, सून व नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी शुक्रवार, दि.२७ मार्च रोजी, तर उत्तरक्रिया विधी शनिवार, दि.२८ मार्च रोजी आदगाव येथील निवासस्थानी पार पडणार आहेत.

## निवडक



### चंद्रकांत भोईर पुरस्काराने सन्मानित

**रसायनी :** आर्ट्स, टुरिझम अँड कल्चर फेस्टिव्हल समिती गोवा आणि श्री नागेश महारुद्र फाउंडेशन, गोवा यांच्यावतीने आयोजित राष्ट्रीय लोक गौरव सन्मान परिषद सन २०२६ लक्षवेधी पुरस्कार वितरण सोहळा रविवारी (दि.२२) पणजी येथील कला व संस्कृती संचनालय भवनात पार पडला. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांना सन्मानित करण्यात आले. यावेळी पलस्पे ग्रामपंचायतीचे सलग २५ वर्षे काळावधी पूर्ण करणारे माजी सरपंच चंद्रकांत अर्जुन भोईर यांना 'द ग्रेट छत्रपती शिवाजी महाराज पुरस्काराने' सन्मानित करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने मान्यवर तसेच देशभरातील पुरस्कारकर्ते उपस्थित होते. माजी सरपंच चंद्रकांत भोईर यांनी आपल्या २५ वर्षे सरपंच कारकिर्दीत विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले. ग्रामपंचायत हद्दीत त्यांनी नागरिकांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांना सामोरं जात निराकरण केले. सामाजिक कार्यांत ते वयाच्या ७३ वर्षांनंतरही कार्यरत आहेत. त्यांच्या कार्यावर प्रेरीत होऊन मा. सरपंच चंद्रकांत अर्जुन भोईर यांना अमेरिका इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीने सोशल वर्कमध्ये डॉक्टरेट प्रदान केली आहे. त्यांना देशातील अनेक संघटनांनी त्यांच्या कार्याची दखल घेऊन समाजोपयोगी पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले.




### माथेरानमध्ये ईद उत्साहात साजरी

**माथेरान :** माथेरानमध्ये ईद मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. महिनाभर कडक उपवास केल्यानंतर मुस्लिम बांधवांनी ईद साजरी करत एकात्मतेचा संदेश दिला. सकाळी लवकरच मशिदीमध्ये मुस्लिम बांधव जमा झाले होते. विशेष म्हणजे ज्येष्ठ नागरिकांसह लहान मुलांनी सुद्धा रोजा पाळून धार्मिक परंपरेचे पालन केले. यामुळे सर्व मुस्लिम समाजात वेगळाच उत्साह पाहायला मिळाला. सायंकाळी मुस्लिम मोहल्ला येथे छोटेखानी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी छोटेखाणी अल्पोपहार कार्यक्रम करण्यात आला. यावेळी माथेरान नगरीचे नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी, उद्योजक भास्कर शिंदे, वन समिती अध्यक्ष योगेश जाधव नरेश परदेशी, भाजपाध्यक्ष प्रवीण सकपाळ, किरण चौधरी, विविध पक्षाचे मंडळाचे पदाधिकारी कार्यकर्ते त्याचप्रमाणे अन्य नगरसेवक नगरसेविका आवर्जून उपस्थित होत्या.



### श्री स्वामी समर्थांचा पालखी सोहळा

**नागोठणे :** नागोठण्यात श्री स्वामी समर्थ प्रकट दिन भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. श्री स्वामी समर्थ प्रकट दिनानिमित्त श्री स्वामी समर्थ आध्यात्मिक विकास केंद्र, खडक आळी नागोठणे येथे दि.२० मार्च रोजी सकाळपासून विविध धार्मिक कार्यक्रम झाले. त्यानंतर दुपारी ३ वाजता श्री स्वामी समर्थांच्या पालखी सोहळ्यास प्रारंभ झाला. हा पालखी सोहळा शांतीनगर भागातून हायवे नाका, छत्रपती शिवाजी महाराज चौक, बाजारपेठ, नागोठणे पोलीस ठाणे नंतर ग्रामपंचायत कार्यालय, ग्रामदेवता श्री जोगेश्वरी माता मंदिर परिसराकडून आंगरआळी भागातून खडकआळीमार्गे पुन्हा श्री स्वामी समर्थ महाराजांच्या मठात पालखी आल्यानंतर या पालखी सोहळ्याची सांगता झाली. यावेळी श्री स्वामी समर्थ मठात आरती घेण्यात आली. तद्नंतर रात्री सर्व उपस्थित ग्रामस्थांनी तसेच स्वामी भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतल्यानंतर श्री स्वामी समर्थ महाराजांच्या प्रकट दिनानिमित्त आयोजित उत्सवाची सांगता झाली.

### माणगावात स्वामींचा प्रकट दिन साजरा

**माणगाव :** माणगावातील साईनगर पूर्व भागातील श्री स्वामी समर्थ मठ येथे स्वामींचा प्रकट दिन शुक्रवारी (दि.२०) मोठ्या भक्तिभावाने साजरा



करण्यात आला. या दिवशी सकाळी स्वामींची पाद्यपूजा, सत्य दत्ताची पूजा, दुपारी बारा वाजता महाआरती, महाप्रसाद, नामस्मरण, महाआरती संध्याकाळी, महाप्रसाद आणि भजनाने कार्यक्रमाची सांगता झाली. प्रकट दिनाच्या निमित्ताने संपूर्ण माणगाव तालुक्यातील विविध ठिकाणाहून स्वामीभक्त भाविक आले होते. या कार्यक्रमासाठी श्री स्वामी समर्थ चॅरिटेबल ट्रस्ट माणगाव, स्वामी समर्थ उत्सव कमिटी माणगाव आणि सर्व स्वामी भक्तांनी कार्यक्रम व्यवस्थित पार पाडण्यासाठी विशेष मेहनत घेतली.

### 'कोणालाही सोडणार नाही'

**मुंबई :** नाशिकचा भोंदू बाबा अशोक खरात याच्या अघोरी कृत्यांचे आणि लैंगिक शोषणाचे धक्कादायक वास्तव समोर आल्यानंतर, राज्यभरात खळबळ उडाली. सोमवारी विधानसभेतही या प्रकरणाचे पडसाद उमटले. विरोधकांनी यावर चर्चेची मागणी करत गदारोळ घातला. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मध्यस्ती करत मंगळवारी या प्रकरणावर निवेदन करणार असल्याचे सांगितले. तसेच भोंदुबाबा प्रकरणात कुणालाही सोडणार नाही, असे आश्वासनही त्यांनी दिले. कॉँग्रेस गटनेते विजय वडेट्टीवार यांनी अशोक खरात प्रकरणात सोमवारी सभागृहात स्थगन प्रस्ताव मांडला. त्यावर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी, शासन यात कारवाई करत असून शासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घ्यावी, असे आदेश दिले. मात्र, त्यानंतरही विरोधकांनी या प्रकरणावर चर्चा घडवून आणण्याची मागणी कायम ठेवत गदारोळ घातला. मुख्यमंत्र्यांनी यात हस्तक्षेप करीत सरकारची भूमिका स्पष्ट केली.

## गॅस टंचाईला चुलीचा पर्याय | उत्तम चवींसाठी ग्राहकांची पसंती

# मेढेखारमध्ये चुलीवरच्या खमंग चायनीजची मोठी क्रेझ



| पाली-बेणसे | प्रतिनिधी |

मध्य पूर्वेत सुरू असलेल्या युद्धामुळे देशात गॅस टंचाई निर्माण झाली आहे. हॉटेल व्यावसायिकांवर गॅसच्या वापरावर निर्बंध लागू करण्यात आले आहे. परिणामी, अनेक हॉटेल व्यवसायिकांवर हॉटेल बंद ठेवण्याची वेळ ओढावली आहे. युद्धजन्य परिस्थितीमुळे इंधन आणि गॅस पुरवठ्यावर परिणाम झाला असून व्यावसायिक गॅस सिलेंडरचा तुटवडा जाणवू लागला आहे. तसेच शासनाकडून हॉटेल व्यावसायिकांच्या गॅस वापरावर निर्बंध घालण्यात आले आहेत. गेले दोन आठवडे ही परिस्थिती जैसे थे असल्यामुळे आता, हॉटेल व्यावसायिकांवर हॉटेल बंद ठेवण्याची वेळ ओढावली आहे. मात्र, या परिस्थितीवर मेढेखारच्या चायनीज सेंटरचे मालक, मराठी उद्योजक दाम्पत्याने चुलीचा पर्याय उभा केला आहे.

मंगेश म्हात्रे या मराठी माणसाने चायनीज व्यवसायात चव, दर्जा व क्वान्टिटी यामुळे आपला व्यवसायिक प्रभाव टिकवून ठेवला आहे. येथील चायनीज पदार्थांना लाकूड आणि सरपणाच्या आचेवर शिजवल्यामुळे एक नैसर्गिक खमंग चव येते आहे. आजपर्यंत झणझणीत चवीचे गावरान चिकन/मटण खवय्यांना उपलब्ध करून दिल्याचे ऐकीवात होते. मात्र मंगेश म्हात्रे यांच्या ३ चायनीज सेंटरवर पेटती चूल ग्राहकांना आकर्षित करीत आहे. चुलीच्या मंद आचेवर चायनीज शिजल्यामुळे मसाल्यांचा स्वाद त्यात उतरुण अन्नाची पौष्टिकता टिकून राहत आहे.

गावाकडील वातावरणात असलेले मेढेखारचे चायनीज सेंटर सध्या चर्चेत आहे. पोयनाड-नागोठणे मार्गालगत मेढेखारच्या शेतात मोकळ्या हवेशीर जागी चुलीवरचे जेवणाचा स्वाद घेण्याचा एक आनंददायी अनुभव सर्वांनाच मेजवानी ठरतोय. येथील चुलीवरचे चायनीज चाखण्यासाठी दुरवरून ग्राहक येत आहेत. मंगेश म्हात्रे म्हणाले की, येथील चायनीज लोकांना नेहमीच आवडते, मात्र आज गॅस टंचाईत चुलीवरचे चायनीज देण्याचा विचार केला. जेव्हापासून चुलीवरचे खमंग पदार्थ लोकांना मिळायला लागले. तेव्हापासून ते चुलीवरच चायनीज हव असल्याचा आग्रह धरीत आहेत. त्यांना चुलीवरची चव आवडू लागली आहे. घरी जाऊन कॉल करून चायनीजच्या चवीची वाहवा करीत आहेत.

## निवडक

### धनगर समाजाची कार्यकारिणी जाहीर

**खोपोली :** रायगड जिल्हा हर हर चांगभले धनगर समाज संस्थेच्या रायगड जिल्हाध्यक्षपदी अनंता हिरवे यांची निवड करण्यात आली तर उपाध्यक्ष पदी बाळासाहेब आखाडे यांची निवड करण्यात आली, तर यावेळी संस्थेची जिल्हा कार्यकारिणी घोषित करण्यात आली. यावेळी संस्थेच्या जिल्हाध्यक्षपदी अनंता हिरवे, कार्याध्यक्षपदी ॲड. संतोष आखाडे, विठ्ठल आखाडे, उपाध्यक्षपदी बाळासाहेब आखाडे, सहउपाध्यक्ष ॲड. गणेश आखाडे, सचिवपदी संपत ढेबे, खजिनदारपदी रामदास कोकरे, सह खजिनदारपदी नारायण बोडेकर, संघटकपदी नथुराम ढेबे, प्रसिद्धी प्रमुखपदी दत्तात्रय शेडगे, जिल्हा युवक अध्यक्ष हरेश ढेबे, जिल्हा युवक उपाध्यक्षपदी रवींद्र बोडेकर, जिल्हा कार्यकारिणी सदस्यपदी भागू बोडेकर, बबन हिरवे यांची निवड करण्यात आली. सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांची माजी जिल्हाध्यक्ष ॲड. संतोष आखाडे यांच्या हस्ते नियुक्ती पत्रक देण्यात आले. या सर्व पदाधिऱ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.



### भवानी फाऊंडेशनतर्फे रक्तदान

**चिरनेर :** भवानी फाऊंडेशनने एमजीएम कामोठे हॉस्पिटलच्या सहकार्याने शनिवारी (दि.२१) रोजी आयोजित केलेल्या १३ व्या रक्तदान शिबीरात १४७ रक्तदात्यांनी रक्तदान केले. नवी मुंबईतील बेलापुर-सीबीडी येथील व्ही-टाईम्स स्केअर, सेक्टर-१५ येथे रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. अपोलो हॉस्पिटलचे प्रख्यात सर्जन डॉ. नितिश झवर, हरीष इंगळे, उमा आहुजा, सत्या बाबू नायडू आदी मान्यवरांच्या उपस्थितीत रक्तदान शिबीर पार पडले. या शिबिराला परिसरातील १४७ रक्तदात्यांनी प्रतिसाद देत रक्तदान केल्याची माहिती आयोजक भवानी फाऊंडेशननेदिली. भवानी फाऊंडेशनतर्फे सामाजिक बांधिलकी म्हणून फाऊंडेशनचे अध्यक्ष के. डी. शेट्टी, जिक्षित शेट्टी, शिखा शेट्टी, सरीता शेट्टी, प्रियांका शेट्टी आदी संचालकांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केलेले १३ वे रक्तदान शिबीर होते.



### ‘जागो ग्राहक जागो’ पथनाट्यातून जनजागृती

**अलिबाग:** जागतिक ग्राहक दिनानिमित जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड- अलिबाग, जिल्हा पुरवठा विभाग, रायगड-अलिबाग व प्रिझम सामाजिक विकास संस्था अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने अलिबाग समुद्रकिनारा, अलिबाग बस स्थानक या ठिकाणी पथनाट्यातून जनजागृती करण्यात आली. सुरक्षित उत्पादने आत्मविश्वासू ग्राहक या थीम अंतर्गत ग्राहकांना प्राप्त असणाऱ्या हक्कांचे जसे की, सुरक्षिततेचा हक्क, माहिती मिळविण्याचा हक्क, निवडीचा हक्क, तक्रार निवारणाचा हक्क, बाजू ऐकून घेतली जाण्याचा हक्क, ग्राहक शिक्षणाचा हक्काचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी ग्राहकांनी शासनाला सहाय्य करण्याबाबत पावतीशिवाय माल खरेदी करताना किंमत व गुणवत्ता तपासून घेणे, तक्रार निवारणासाठी योग्य ठिकाणी दाद मागण्यास शिकावे, स्वतःची फसवणूक होऊ नये म्हणून शक्यतो काळजी घेणे बाबत ग्राहकांमध्ये जागरुकता येणे आवश्यक असल्याने प्रिझमच्या माध्यमातून जनप्रबोधन करण्यात आले. या कार्यक्रमास दिपाली ब्राह्मणकर सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी, प्रशांत शिंदे अन्नसुरक्षा अधिकारी, सुरेश देवकाते निरीक्षक वैद्य मापन शास्त्र, हर्षल देशमुख पुरवठा निरीक्षण अधिकारी, दिलीप पाटील- सहाय्यक लेखा अधिकारी व पुरवठा विभागाचे कर्मचारी, तपस्वी नंदकुमार गोंधळी, प्रतिक कोळी, विनोद नाईक, निकी बेंडे, सेजल काठे, कशिश पाटील यांसह बहुसंख्य जनसमुदाय उपस्थित होता.

### तळा नगरपंचायतीची अभय योजना

**तळा :** तळा शहरातील घरपट्टी भरणाऱ्या करदात्यांसाठी तळा नगरपंचायतीतर्फे अभय योजना सुरू करण्यात आली आहे. ज्या नागरिकांची ३१ मार्च अखेरीपर्यंतची नगरपंचायतीला देय असलेली घरपट्टी अद्यापपर्यंत भरणा केलेली नाही, अशा करदात्यांकरिता तळा नगरपंचायत शासनाची अभय योजना राबवित आहे. या योजने अंतर्गत करदात्यांनी त्यांनी भरावयाची कराच्या एकूण रक्कमेची एकरकमी भरणा केल्यास त्यांना दिनांक १९ मे २०२५ अखेरपर्यंत लागू झालेल्या २% शास्ती रक्कमेमध्ये ५० टक्के पर्यंत सूट मिळू शकणार आहे.या सूट रक्कमेचा तपशिल नगर पंचायतीच्या नागरिक सुविधा केंद्रातील संगणकावर कर भरणा करतेवेळीच दिसून येईल.यासाठी सुट्टीच्या दिवशी देखील कर भरावयाचा असल्यास नगरपंचायतीचे नागरिक सुविधा केंद्र सुरू ठेवण्यात येणार आहेत. सदरची सवलत ३१ मार्च पर्यंतच लागू असणार आहे.त्यामुळे नगरपंचायत क्षेत्रातील नागरिकांनी थकीत मालमत्ता कराचा भरणा करून शास्तीवरील सवलतीचा लाभ घ्यावा असे आवाहन नगरपंचायत प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **जागा विकणे आहे :** आमची आक्षी स्तंभाजवळील २०.३ गुंठे जागा विकणे आहे. प्रवेश- अलिबाग रेवदंडा रोडवरून थेट कॉलनीचा मुख्य प्रवेश आहे. जागा पूर्ण सपाट आहे व जागेला पूर्ण कंपाऊंड आहे. जागेमध्ये २५ नारळाची व २५ सुपारीची झाडे आहेत. जागेचा प्रवेश पूर्व पश्चिम आहे. इच्छुकांनी थेट संपर्क करावा. संपर्क : ०९६१९०१६१३५
- **भारत पेट्रोल पंप चेंढरे** अलिबाग बायपास येथे कामासाठी मुले पाहिजेत व ऑफिस कामासाठी मुली पाहिजेत. शिक्षण B.Com ७४४७४०४४११/७४४७४०४४३८

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# माणगावात वाहतूक कोंडी कायम

## ●अपूर्ण कामामुळे प्रवाशी संतप्त, मुगवली ब्रिजपर्यंत वाहनांच्या रांगा

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

कोकणातून मुंबईच्या दिशेने परतणाऱ्या वाहनांच्या प्रचंड वाढलेल्या संख्येमुळे माणगाव परिसरात पुन्हा एकदा वाहतूक कोंडी निर्माण झाली. माणगाव-लोणेरे दरम्यान, विशेषतः माणगाव पासून सुमारे तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या मुगवली ब्रिजपर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याने महामार्ग अक्षरशः ठप्प झाला होता.



कोंडीमुळे कोकणवासीयांसह इतर प्रवासी महामार्गावर अडकून पडले. बायपासचे काम अपूर्ण असल्याने वाहतूक कोंडीचा फटका सर्वांना सहन करावा लागत आहे. त्यामुळे ही साडेसाती कायम आहे. याबाबत स्थानिक नागरिक व कोकणवासीय नागरिकात संताप व्यक्त होत आहे.

उन्हाच्या तडाख्यात आणि प्रचंड गर्दीत नागरिकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागले. अनेकांना आपल्या कामाच्या ठिकाणी पोहोचण्यात उशीर झाला, तर काही प्रवाशांना आवश्यक सेवा मिळण्यातही अडचणी आल्या. दरम्यान, खा. सुनील तटकरे यांनी नुकत्याच माणगाव येथील एका कार्यक्रमात ३१ मेपर्यंत माणगाव बायपास मार्ग वाहतुकीसाठी खुला होईल, असे आश्वासन दिले होते. मात्र प्रत्यक्षात बायपासचे काम अद्याप मोठ्या प्रमाणात अपूर्ण असल्याने नागरिकांमध्ये संभ्रम आणि नाराजी निर्माण झाली आहे. बायपास सुरू न झाल्यास माणगाव बाजारपेठेतील वाहतूक कोंडीचा प्रश्न कायम राहणार, हे स्पष्ट होत आहे. सोमवारी मुंबईकडे परतीच्या प्रवासाला निघालेल्या कोकण वासीयांची मोठी गर्दी झाल्याने दिवसभर कोंडीची तीव्रता वाढतच गेली.

माणगाव बाजारपेठ आणि महामार्गावरील वाहतूक कोंडी आता नित्याची समस्या बनली असून स्थानिक नागरिक आणि प्रवासी या समस्येमुळे अक्षरशः वैतागले आहेत. वारंवार दिली जाणारी आश्वासने आणि प्रत्यक्षात होणारा विलंब यामुळे प्रशासनावरील विश्वासही ढासळताना दिसत आहे. माणगाव बायपासचे काम तातडीने पूर्ण करून वाहतुकीसाठी खुला करण्यात यावा, तसेच पर्यायी वाहतूक नियोजन करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी जोरदार मागणी आता सर्व स्तरातून होत आहे.

### पोलिसांची दमछाक

परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी वाहतूक शाखा व माणगाव पोलीस यांनी संयुक्तपणे मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्त ठेवला होता. मात्र वाहनांची प्रचंड संख्या आणि अरुंद रस्त्यांमुळे कोंडी सोडवताना पोलिसांची चांगलीच दमछाक झाली.

## भातसईत रंगणार यात्रोत्सव

**। चणेरा । प्रतिनिधी ।**

आदर्शगाव भातसई येथे श्री महादेवी मातेचा पारंपरिक पालखी सोहळा आणि यात्रोत्सव मंगळवार (दि.३१) मार्च रोजी होणार असून बुधवार (दि.१) एप्रिल रोजी यात्रोत्सव साजरा केला जाणार आहे. दरवर्षी चैत्र पौर्णिमेनिमित्त हा यात्रोत्सव साजरा करण्याची परंपरा आहे. सायंकाळी ४ ते ७ वाजेदरम्यान येणाऱ्या पौर्णिमेच्या दिवशी उत्सव भरवला जातो. याशिवाय नवरात्रोत्सवही येथे अत्यंत भक्तिभावाने साजरा केला जातो. नवस फेडण्यासाठी दूरदूरहून भाविक मोठ्या संख्येने येथे उपस्थित राहतात. सध्या देवीचे भगत चिंतामणी खरीवले असून खरीवले आहते. यात्रा दोन दिवस चालते. त्यात विविध पारंपरिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. यात्रेत नवसाच्या काठ्यांची मिरवणूक काढली जाते. ‘गळ लावणे’ हा यात्रेचा विशेष धार्मिक विधी मानला जातो, जो भाविकांसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू असतो. मंगळवार ३१ मार्च रोजी दुपारी १२ वाजता भातसई गावातील येशी मंदिरातून पालखी मिरवणुकीस प्रारंभ होईल. ही पालखी झोलांबे, कोपरे आणि लक्ष्मीनगर या गावांमधून फिरत सायंकाळी सुमारे ७ वाजता पुन्हा भातसई येथे परत येईल. या पारंपरिक सोहळ्यासाठी पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असून, संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून जाणार आहे.

## नवघर शाळेस आर्थिक मदत

**उरण :** नवघर गावातील सामाजिक कार्यकर्ते अविनाश म्हात्रे यांच्या मुलगा युगसाई म्हात्रे याचा नववा वाढदिवसानिमित्त ग्रामपंचायत नवघरचे उपसरपंच प्रियदर्शनी म्हात्रे यांच्यातर्फे राजिप शाळा नवघरच्या नवीन इमारती बांधकामासाठी आर्थिक सहकार्याचा धनादेश शाळेतील मुख्याध्यापक समता ठाकूर, उषा गावंड, सरिता गोरे, गणेश गावंड, प्रकाश जोशी, अनिल म्हात्रे, प्रसाद म्हात्रे यांच्याकडे देण्यात आला. यानिमित्त शाळेतर्फे युगसाईला वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. सामाजिक बांधिलकी जपत केलेल्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## पोयनाडमध्ये आरोग्य तपासणी शिबीर



**। पोयनाड । प्रतिनिधी ।**

पोयनाड येथील श्रीराम मंदिर ट्रस्ट, उज्वल भविष्य सामाजिक संस्था खंडाळे व माणुसकी प्रतिष्ठान जीतनगर वायशेत यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन रविवारी (दि.२२) मार्च रोजी श्रीराम मंदिर पटांगण रामआळी पोयनाड येथे संपन्न झाले. यावेळी ७० पेक्षा जास्ती लाभार्थी लोकांनी या शिबिरामध्ये सहभाग घेऊन आरोग्य तपासणी करून घेतली. शिबिरामध्ये रक्तदाब, मधुमेह, नेत्ररोग तपासणी, कर्करोग, हृदयरोग, अस्थिरोग तपासणी करून मोफत औषध उपचार उपलब्ध करून देण्यात आले. तसेच गरजूंना पुढील उपचाराकरीता वाशी येथील माधव सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल तसेच आस्था नेत्रालय अलिबाग येथे बोलाविण्यात आले आहे. शिबिरासाठी डॉ. डॉ. राजाराम हुलवान, डॉ. नितीन गांधी, डॉ. उज्ज्वला चंदनशिव, डॉ. गौरव पाटील, डॉ. श्रेयस सोमनाथ, आस्था नेत्रालय यांची संपूर्ण टीम उपस्थित होती. श्रीराम मंदिर ट्रस्ट पोयनाडचे सुनिल पाटील, रमेश तावडे, दिपक चवरकर, किशोर तावडे, देवेंद्र केळुस्कर, दिलीप कारेकर, विजेंद्र तावडे, अजय टेमकर, राजेश जाधव, चंद्रशेखर मसुरकर, नंदकुमार पाटील, आदित्य कडू, अंकिता चवरकर, मनिषा टेमकर, लीना चवरकर यांनी शिबीर यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

## नंबर प्लेट नसलेल्या डंपरवर कारवाईची मागणी

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन तालुक्यात मागील काही दिवसांपासून विविध विकास प्रकल्प सुरू आहेत. या विकास प्रकल्पांवरती अनेक डंपर मटेरियलची वाहतूक करताना पाहायला मिळतात. त्याचप्रमाणे तालुक्यात उत्खनन करण्यात येणारे बॉक्साइट देखील डंपरद्वारे वाहतूक करण्यात येत असते. श्रीवर्धन हरीहरेश्वर मार्गावरील गालसुरे गावाच्या हद्दीत एक डंपर चालक, डंपरच्या पुढच्या बाजूला व मागच्या बाजूला कोणतीही नंबर प्लेट नसताना सुसाटपणे डंपर चालवत असल्याचे नागरिकांच्या लक्षात आले.

सदर डंपर चालकाला नागरिकांनी अडविल्यानंतर तो थांबला. डंपर खाली करून येत असल्यामुळे रिकामा असल्याने डंपर चालक गाडी सुसाट वेगाने चालवत होता. अशाप्रकारे सुसाट वाहन चालक वाहन चालवीत असल्यामुळे




अपघातांचा धोका दिवसेंदिवस वाढला आहे. अशा प्रकारे अपघात घडल्यास डंपरला कोणत्याही प्रकारची नंबर प्लेट नसल्यामुळे चालकाला पळून जाण्यास मोकळे रान मिळते.

नुकतेच पेण येथील प्रादेशिक परिवहन विभागाने श्रीवर्धन तालुक्यात अनेक डंपर्स वरती कारवाई देखील केली होती. परंतु इतके होऊन सुद्धा डंपर चालक व मालक मुजोरपणे गाड्या हाकत असल्यामुळे श्रीवर्धन तालुक्यातील जनतेमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तरी प्रादेशिक परिवहन विभाग पेण व स्थानिक पोलिसांनी सदर डंपर चालकाला शोधून काढून त्याच्यावरती कडक कारवाई करण्याची मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

## ओबीसी समितीचा पदभार सोहळा

**उरण :** महाराष्ट्र ओबीसी कृती समितीचश पदभार सोहळा रविवारी (दि. २२) रोजी खारघर येथे संपन्न झाली. यावेळी संरक्षक मंडळचे पदाधिकारी डॉ. नामदेवराव राऊत, प्रकाश सिद्ध, पी. आर. बडगुजर, एस एम बडगुजर, शालिकजी नेवारे, मधुकर चोपडे, हेमंत ढोले, श्रावण फरकाडे, राम खरपूरिया, सरिता गाकरे, नरेंद्र बडगुजर, मोरेश्वर भादे, दिपक नेवे, मुकुंद मुसळे, महादेव बंडा, प्रल्हाद कासकर, शांताराम गुजर, विकास संसारे, रविंद्र गोलांडे, विलास पाटील, श्याम सरगिरे, मुकुंद अडेवार, संदीप गोलाईल, अनिल बोरसे, आर. डी चौधरी, सुनील महाजन, सतिश गुर्जर, ॲड. चंद्रकांत बिडकर, नरेंद्र कापगाते आदी उपस्थित होते.



## शहीद दिनानिमित्त क्रांतीवीरांना अभिवादन

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरूड शहरातील जुनी पेठ येथील मोहन करंदेकर यांच्या निवासस्थानी क्रांतीवीर भगतसिंग राजगुरु व सुखदेव यांच्या ९४ व्या स्मृतीदिनी शेकडो मान्यवरांच्या उपस्थितीत अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी क्रांतीवीराना पुष्प वाहून आदरांजली देत स्मरण केले. राष्ट्र देशभक्ती व खरा इतिहास नवीन पिढीला ज्ञात व्हावा अशी करंदेकरांची धारणा आहे.

याप्रसंगी पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे, स्नेहा पाटील, चिंतामणी मकु, नितिन आबुर्ले, श्रीकांत खोत, मकरंद पाटील, स्वप्निल कवळे, दिपक राजपुरकर, अजित कारभारी, ऋषि पोतदार, सोनल मेहरोळे, रमण विहुरकर, पांडुरंग आरेकर, राजेश गुप्ते, संदीप पाटील, चद्रकांत भोईर, गणेश जमादार, सुधीर भगत आदी मान्यवर भेट देऊन वीर हुतात्म्यांना मानवंदना देण्यात आली.



## पिरकोन येथे पुस्तकांचे प्रकाशन

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

ज्येष्ठ साहित्यिक ए.डी.पाटील यांच्या लेखणीतून उतरलेल्या मला भावलेली व्यक्तिमत्वे व सारडे गाव आणि त्याचा भवताल या दोन पुस्तकांचा प्रकाशन सोहळा रविवारी (दि. २२) रोजी पिरकोन उरण येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयात आयोजित करण्यात आला होता. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते या दोन पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. या कार्यक्रमास प्रा. सुरेश पाटील, स्मिता वाजेकर, जीवन गावंड, चंद्रकांत मढवी, सुधाकर पाटील, ॲड. के एस पाटील, प्रकाश पाटील, के. एम. मढवी, प्रफुल्ल वेदक, गोपाळ पाटील उपस्थित होते. यावेळी ए. डी. पाटील यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रफुल्ल वेदक, ए. ए. पाटील, बी. के. भगत, एल. एन. भगत, सी. के. पाटील, मच्छिंद्र म्हात्रे, संजीव पाटील, समता ठाकूर, मीनल माळी, लवेंद्र मोकल आदीने परिश्रम घेतले.

## एटीएमची हातचलाखी करुन फसवणूक

**पनवेल:** पैसे काढण्या करीता गेलेल्या इसमाची दोन अनोळखी इसमांनी हात चालाकी करून एटीएमकार्डाची हातचालाखी करून ४५ हजार रुपयाची रक्कमेची फसवणूक केल्याची घटना पनवेल शहरात घडली आहे. चिपळे येथे राहणारे अरूप मित्रा हे मायाबार जवळील एचडीएफसी एटीएममध्ये पैसे काढण्या करीता गेले असता दोन अनोळखी इसमांनी हात चालाकी करून त्यांचे ॲक्सीस बँकेच्या एटीएम कार्डाची हातचालाखी करून ४५ हजार रुपयांची फसवणूक केली. याबाबत पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## नागरिकांनी वणवा रोखण्यासाठी दक्ष राहा

**। तळा । प्रतिनिधी ।**

कोकणात उन्हाळ्याची चाहूल लागताच डोंगरांना वणवे लागण्याचे प्रमाण वाढते. जिल्ह्यातील तळा तालुका हा डोंगराळ आणि वनसंपत्तीने नटलेला भाग असल्याने, येथील निसर्गसंपदा आणि आंबा-काजू बागांचे संरक्षण करण्यासाठी नागरिकांनी वणवा लागणार नाही याची विशेष दक्षता घ्यावी, असे आवाहन डॉ. दत्ता कुंटेवाड यांनी केले आहे.

दरवर्षी उन्हाळ्यात अज्ञातांकडून किंवा मानवी हलगर्जीपणामुळे डोंगरांना आग लावली जाते. याचा मोठा फटका केवळ पर्यावरणालाच बसत नाही, तर शेतकऱ्यांच्या कष्टाने फुलवलेल्या फळबागाही खाक होतात. या पार्श्वभूमीवर डॉ. कुंटेवाड यांनी स्थानिक ग्रामस्थ, शेतकरी आणि पर्यटकांना सतर्क राहण्याचे आ-वाहन केले आहे. यासाठी त्यांनी नागरिकांना प्रतिबंधात्मक उपायही सुचवलेले आहेत.

राब जाळताना खबरदारी: शेतकरी बांधवांनी शेतीची मशागत करताना मराबफ पेटवताना तो नियंत्रणाबाहेर जाणार नाही याची काळजी घ्यावी. वाऱ्याचा वेग पाहूनच शेतातील कचरा जाळावा.

फायर लाईन (जाळ पट्टा): आपल्या बागेभोवतीचा पाला-पाचोळा साफ करून फायर लाईन तयार करावी, जेणेकरून डोंगरावरील आग बागेत शिरणार नाही.

ज्वलंत वस्तू फेकू नका: जंगलातून प्रवास करताना पेटती काडी, सिगारेट किंवा विडीचे थोटूक फेकू नये. पर्यटकांनी निसर्गाचा आनंद घेताना आग लागणार नाही याची जाणीव ठेवावी.

वन्यजीवांचे रक्षण: वणव्यामुळे अनेक दुर्मिळ पक्षी, सरपटणारे प्राणी आणि कीटक नष्ट होतात. वणवा लागल्यास तो केवळ एका झाडाला नसून संपूर्ण परिसरातील जैवविविधतेला नष्ट करतो त्यामुळे निसर्ग वाचवण्यासाठी प्रत्येक नागरिकाने दक्षतादूत म्हणून काम करावे, असे सांगतानाच वणव्याची कोणतीही घटना निदर्शनास आल्यास तातडीने स्थानिक वन विभाग, नगरपंचायत, ग्रामपंचायतीला माहिती देण्याचे आवाहनही डॉ. कुंटेवाड यांच्याकडून नागरिकांना करण्यात आले आहे.

### हिरेन हिसाळकेची सायकल सफर | न थांबता १०० किलोमीटर अंतर पार

## ग्लोबल वॉर्मिंग धोक्याबाबत जनजागृती

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ येथील विद्या विकास शाळेचा विद्यार्थी असलेल्या हिरेन हिसाळके याने सोमवारी (दि.२३) मार्च रोजी जागतिक हवामान शास्त्र दिनाच्यानिमित्ताने सायकलफेरी काढून विद्यार्थी आणि नागरिकांमध्ये जनजागृती करण्याचा प्रयत्न केला. सलग तिसऱ्या वर्षी हा प्रयोग हिरेनने केला असून शालेय विद्यार्थ्यांनी चांगला प्रतिसाद दिला.




१९५० साली जागतिक हवामानशास्त्र संघटना स्थापन झाली. स्थानिक हवामानाचा संबंध जागतिक पातळीवर नैसर्गिक बदलांशी असतो हे आपल्या ध्यानात यावे हवामानाचे महत्त्व समजावे तसेच याविषयी जाणीव आणि जागरूकता निर्माण व्हावी. या उद्देशाने २३ मार्च हा दिवस जागतिक हवामान दिन आजच्या युगात ग्लोबल वॉर्मिंगचा धोका लक्षात घेऊन विचारमंथन करण्यावर शास्त्रज्ञ भर देत आहेत.

कर्जत तालुक्यातील नेरळ गावातील विद्या विकास मंदिर शाळेचं विद्यार्थी असलेल्या हिरेनने भविष्यात भेडसावणाऱ्या ग्लोबल वॉर्मिंगचे धोक्याबाबत जनजागृती करीत असतो.

एकाच वेळी सलग न थांबता १०० किलोमीटर अंतर सायकल चालवण्याची अनेकदा सफर पार करणाऱ्या हिरेनने हवामानातील बदल आपल्या दैनंदिन जीवनात कसे महत्वाचे ठरत आहेत. त्या बदलामुळे किती नुकसान समाजाचे होत आहेत हे दाखवण्यासाठी नेरळ गावातील १४ वर्षीय विद्यार्थी सायकलवरून शाळा शाळात जाऊन जनजागृती करीत असतो. त्यावेळी भविष्यात ग्लोबल वॉर्मिंगमुळे निर्माण होणारी स्थिती दर्शविण्यासाठी सायकलची भासणारी गरज आणि त्यावेळी स्वतःचे पाठीवर ऑक्सिजन सिलेंडर घेऊन जाण्याची वेळ येऊ शकते. प्रत्येकाला अंगावर ठराविक पध्दतीचे कपडे परिधान करावे लागू शकतात हे सांगण्यासाठी सायकलवरून जनजागृती करीत असतो.

सायकलवर विविध माहीतीचे फलक घेऊन सर्वांचाच लक्ष वेधून घेतलेले पीपीपी किट घालुन गावातील अनेक शाळांना भेट देत नाक्या नाक्यावर भर उन्हात उभ राहून जनजागृती केली आहे. वाढत्या प्रदूषणाला आळा बसावा म्हणून दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुध्दा आगळ्यावेगळ्या पद्धतीने जनजागृती करण्याचा प्रयत्न केला आहे.

विद्या विकास मंदिर शाळेतून निघालेली ही सायकल सैर शाळा शाळात जाऊन जनजागृती करण्याचे कार्य हिरेन करीत होता. पुढे नेरळ बाजार पेठ, नेरळ पोलीस ठाणे असा नेरळ साई मंदिर नाका येथून नेरळ विद्या भवन शाळा आणि पुढे सगुणा बाग कृषी पर्यटन केंद्र असा प्रवास करीत ही सायकल सैर जनजागृती करीत फिरली. हिरेनच्या या वेगळी उपक्रमाला सर्वांची साथ मिळत होती.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली शेतजमिन मिळकत तिचे मालक १.श्रीमती अर्चना भारद्वाज भूषण, रा.कॉटर नंबर B-606 होरायझन राजस्व, रहेजा विहार तुंगा पवई, मुंबई-४०००७२, २.कु.झिनुक झाजेरीया, डी-१७, लविला पॅलेस सीएचएस, प्लॉट नं.२५५-२५८/२६३-२६७ अंबा मार्ग, सेक्टर २१, नवी मुंबई नेरूळ नोड ३, ठाणे ४००७०७, ३.असि मनसुखलाल कोठारी, A/201/1202 संभवनाथ टॉवर को.हौ.सो, सुधा पार्क शांती सुधा रोड, गरोडिया नगर, घाटकोपर पूर्व, मुंबई, ४ श्रीमती.शिप्रा शावलिनी, १९९८४, अतास अदुवेतेज अहिंसा खंडा १, इंदिरापुरम, गाजियाबाद, उत्तर प्रदेश, ५.श्रीमती माला प्रसाद, रा.महेश कुंज सुमिती पथ एनआयटी मागे, पाटणा, महेंद्रू, बिहार-८०००६, यांचेकडून कायमची खरेदी करणेचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे गौरकामत, ता.कर्जत जि.रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| ९६ | ० | ३२.९८.०० | १२.३१ |

पैकी विक्री केले क्षेत्र २० एकर

सदर मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पुर्ण केला जाईल. मागाहुन येणाऱ्या तक्रारी आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

दि.२४/३/२०२६

**ॲड.कैलास गणपत मोरे**
बी.एल.एस, एलएल.बी
प्रभात अपार्टमेंट रूम.नं ४. दुसरा मजला
सुनिल चिक्कीजवळ ता.कर्जत जि.रायगड
मो.नं.९९६०८३८१६४/९०२८५०८४९६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसने असे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली शेतजमिन मिळकत तिचे मालक हृषिकेश अरूण गायकवाड व इतर, रा.कुशिवली, ता.कर्जत, जि.रायगड यांचेकडून विकसित करणेसाठी घेणेचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे गौरकामत, ता.कर्जत जि.रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| ९६ | ० | ३२.९८.०० | १२.३१ |

पैकी विकसित करणेसाठी दिलेले क्षेत्र ३१ एकर

सदर मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पुर्ण केला जाईल. मागाहुन येणाऱ्या तक्रारी आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

दि.२४/३/२०२६

**ॲड.कैलास गणपत मोरे**
बी.एल.एस, एलएल.बी
प्रभात अपार्टमेंट रूम.नं ४. दुसरा मजला
सुनिल चिक्कीजवळ ता.कर्जत जि.रायगड
मो.नं.९९६०८३८१६४/९०२८५०८४९६

## पनवेल महानगरपालिका

**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

कार्यालय : २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३ Email : panvelcorporation@gmail.com

जा.क्र.पमपा/पापुवि/९९२५/प्र.क्र. ०१/१८४/२६ दि. २३/०३/२०२६

**निविदा सुचना**

| अ.क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|
| १) | PMC/WS/४९/२०२५-२६ | देहरंग धरणातून पनवेल शहराकरिता वाढीव पाणी पुरवठा योजना करणे. | रु.११५,४८,४१,२५५/- |

वरील ई - निविदेबाबतची माहिती शासनाच्या 'http://mahatenders.gov.in' या संकेत स्थळावर दि. २४/०३/२०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित निविदाकारांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
**(गणेश शेटे)**
अतिरिक्त आयुक्त - १
पनवेल महानगरपालिका

## अलिबाग नगरपरिषद, अलिबाग

**वार्षिक जाहीर निविदा सूचना सन २०२६-२७**

अलिबाग नगरपरिषद इच्छुक ठेकेदार/पुरवठादार यांच्याकडून खालील सेवेसाठी दप्तर विभागांकडून सन-२०२६ वर्षाकरीता खुर्च्या पुरविणे याकरीता जाहीर निविदा मागविण्यात येत आहे.

| विभाग | कामाचे नाव | इसारा रक्कम | निविदा फॉर्म किंमत | निविदा फॉर्म मिळणेची अंतिम तारीख वेळ | सिलबंद निविदा सादर करणेची अंतिम तारीख व वेळ |
|---|---|---|---|---|---|
| दप्तर विभाग | कार्यालयासाठी खुर्च्या पुरविणे. सुप्रिम कंपनी फोमच्या खुर्च्या ५० नग (लाल) व प्लॅस्टिक खुर्च्या ५० नग (विनहाताच्या) प्लॅस्टो कंपनी | ३०००/- | ३००/- | २४/०३/२०२६ ते ०२/०४/२०२६ कार्यालयीन वेळेत सकाळी १० ते ५ सायं पर्यंत. | ०७/०४/२०२६ सकाळी १० ते सायं. ५ पर्यंत. |

सदरचे निविदा बाबत अधिक माहिती कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस वगळता) संबंधित दप्तर विभागात मिळेल, तसेच उर्वरित अटी व शर्ती अलिबाग नगरपरिषद निविदा फॉर्ममध्ये समाविष्ट केलेल्या आहेत.

सही/-
**मुख्याधिकारी**
**अलिबाग नगरपरिषद**

## जाहिर नोटिस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसने कळविण्यात येते की, आमचे अशिल हे खालील वर्णनाच्या मिळकतीचे विद्यमान मालकाकडुन कायम खरेदी करणार असुन तशी बोलनी आमचे अशिल व मिळकतीचे मालक मध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**

मालकाचे नाव : १) चंद्रशेखर सिताराम जाधव, २) प्रभाकर सिताराम जाधव, ३) सुविता सिताराम जाधव, ४) सुधाकर सिताराम जाधव, ५) सुभाष सिताराम जाधव, ६) स्वाती सिताराम जाधव, ७) वैशाली दिपक पवार, ८) अमिता अमोल मोहिते ९) मनाली राकेश गवाने, १०) मयुर अनंत तांबे ११) महेश अनंत तांबे सर्व
रा. मु . नगरोली, ता. माणगांव, जि. रायगड

| मौजे | भुमापन क्र.व उपविभाग | भो.ग. वर्ग | क्षेत्र (हे. आर) | आकार (रू. पै) |
|---|---|---|---|---|
| नगरोली | ७५/२ | १ | ०.५०.१० ०.००.५० ०.५०.६० | ४.७५ |

वरील मिळकतीचे कोणतेही भागावर कोणाचेही विक्री गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसा, हक्क, लिज, चार्ज, पोटगी, वहिवाट, (जाण्या-येण्याचा मार्ग), इजमेंटरी या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध असल्यास अथवा कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीची विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी हरकत अगर तकार ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ (चौदा) दिवसांच्या आत सही करणार यांचेकडे लेखी स्वरूपात योग्य ते कागदपत्रे पुराव्या सहीत सादर करावे.

मुदतीत कोणत्याही प्रकारची तक्रार न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहेत. असे गृहित धरून आमचे आशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहुन कोणाचीही तक्रार हरकत राहिल्यास ती विचारात घेतली जाणार नाही हे सर्वास कळावे.

माणगांव
दिनांक :- २३/०३/२०२६

सही/-
**(ॲड. पी. एम. जाधव)**
बी.कॉम.एल.एल.बी.
पो. इंदापूर, ता. माणगाव, जि. रायगड
मो.नं. ७२१९५४६०९७

## जाहीर नोटिस

सर्व लोकांना या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, मौजे चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील सर्व्हे नं.१७ पैकी बिनशेती प्लॉट नं.१५ क्षेत्र ३०० चौ.फूट या बिनशेती मिळकतीवरील 'बालाजी टॉवर को ऑप हौ. सोसा. लि.' या सोसायटीमधील दुसऱ्या मजल्यावरील निवासी सदनिका क्र.२०१, क्षेत्र ६६४ चौ.फुट (बिल्टअप एरिया) ४७४ चौ.फुट (कारपेट एरिया) ही निवासी सदनिका आमचे अशिलांनी तिचे विद्यमान मालक श्री. समीर मोहन सावंत रा. १४०२/२८, हावरे सिटी, घोडबंदर रोड, कासारवडवली, जिल्हा ठाणे यांचेकडून कायम खरेदीखताने विकत घेण्याबाबत चर्चा सुरू केली आहे.

सदरची निवासी सदनिका पुर्णपणे निर्वेध व बोजाविरहीत असल्याची खात्री विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेली आहे. तरीही सदर सदनिकेसंदर्भात अन्य कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, मालकी, ताबे, कब्जा, वहिवाट, तारण, दान, गहाण, लीज, लीन, कर्ज, पोटगी, इजमेंट हक्क, भाडेपट्टा, करार, साठेकरार, बक्षीसपत्र, खरेदीखत, मृत्युपत्र, वारसा हक्क, अथवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती सर्व कागदोपत्री पुराव्यांसह खाली सही करणार यांच्याकडे सादर कराव्यात. उक्त मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास सदर निवासी सदनिका पूर्णपणे निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजुन आमचे अशिल सदर सदनिकेच्या विद्यमान मालकांबरोबर खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. व अशाप्रकारचा कुणाचाही कसलाही हक्क व हितसंबंध असल्यास तो त्यांनी आमचे अशिलांचे लाभात जाणीवपुर्वक सोडून दिला आहे असे समजण्यात येईल हे सर्वास कळावे.

अलिबाग,
ता. २४/०३/२०२६

सही /-
**ॲड. राकेश पी. लाडे**
'श्रीकृपा', भाऊसाहेब लेले चौक,
जुन्या नगरपालिकेसमोर, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**


## जाहीर सूचना

जनतेस याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, आम्ही खालील निर्देशित प्रथम अनुसूचीमध्ये विस्तृतपणे विवरणीत मालमत्तेसंदर्भात (प्रथम मालमत्ता) खालील निर्देशित प्रथम अनुसूचीमध्ये विस्तृतपणे विवरणीत मालमत्तेसंदर्भात (प्रथम मालमत्ता) ए (१) सकीब रशीद मस्कती व (२) मार्क जोसेफ सेल्वीन यांच्या आणि खालील निर्देशित द्वितीय अनुसूचीमध्ये विस्तृतपणे विवरणीत मालमत्तेसंदर्भात (द्वितीय मालमत्ता) (बी) (१) साकीब रशीद मस्कती व २. तनाझ मार्कसेल्वीन यांच्या हक्कांची चौकशी करीत आहोत. प्रथम मालमत्ता व द्वितीय मालमत्ता यापुढे एकत्रितरीत्या मालमत्ता म्हणूव उल्लेखित आहेत.

कोणीही घटक/व्यक्ती, यामध्ये कोणतीही बँक वा वित्तीय संस्था यांचा समावेश असेल यांचा प्रथम मालमत्ता व/वा द्वितीय मालमत्ता वा तिचा कोणताही भाग वा हिश्श्यासंदर्भात उत्तराधिकार, गहाण, विक्री, भेट, भाडेकरार, उप-भाडेकरार, विनिमय, धारणाधिकार, अनुज्ञप्ती, विभाजन, प्रभार, न्यास, देखभाल, सुविधाधिकार, ताबा, कब्जा, करार, समन्वय, अभिहस्तांकन, विकास, संयुक्त उद्यम, कोणत्याही विधि न्यायालयाचा निवाडा वा आदेश, विचाराधीन विवाद, निषेधाज्ञा, कौटुंबिक वा अन्य व्यवस्था/तडजोड/निपटारा, हमी, एफएसआय उपभोग, प्रथम नकाराधिकार, कोणतेही न्यायाधिकरण, महसूल वा वैधानिक प्राधिकारी वा लवाद यांच्याद्वारे मंजूर नकार वा अन्य मनाई हुकूम, मुखत्यारपत्र वा अन्य कोणत्याही स्वरूपात कोणताही हक्क, अधिकार, हितसंबंध, हिस्सा, दावा, मागणी वा विवाद असल्यास किंवा तसा दावा असल्यास, त्यांनी त्यासंदर्भात लिखित स्वरूपात **अधोहस्ताक्षरितांना त्यांचे कार्यालय पत्ता एक्झामिनर प्रेस बिल्डिंग, ३५, दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१** येथे कागदोपत्री पुराव्यासहित सदर प्रसिद्धी दिनांकापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत सूचित करावे अन्यथा अशा दाव्याच्या कोणत्याही संदर्भाविना विक्री पूर्ण करण्यात येईल व असे दावे हे अधित्यागित व परित्यागित समजण्यात येतील.

**वरील निर्देशित प्रथम अनुसूची**
**(प्रथम मालमत्तेचे विवरण)**

पुढील विवरणीत जमिनीचा सर्व तो भाग व भूखंड-गट क्र.६७/१, मोजमापित ६५-५०-०० आर चौ. मी., महसूल गाव जांबूळपाडा, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील व सीमा पुढीलप्रमाणे :
पूर्वेस वा त्या दिशेस : गट क्र. ६७/२,
पश्चिमेस वा त्या दिशेस : गट क्र. ५६ व ६८
उत्तरेस वा त्या दिशेस : गट क्र. ६७/२
दक्षिणेस वा त्या दिशेस : गट क्र. ९०.

**वरील निर्देशित द्वितीय अनुसूची**
**(द्वितीय मालमत्तेचे विवरण)**

पुढील विवरणीत जमिनीचा सर्व तो भाग व भूखंड - गट क्र.६७/२, मोजमापित ५७-७०-०० आर चौ. मी., महसूल गाव जांबूळपाडा, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील व सीमा पुढीलप्रमाणे :
पूर्वेस वा त्या दिशेस : गट क्र. ६३ व गट क्र. ९३,
पश्चिमेस वा त्या दिशेस : गट क्र. ६७/१ व गट क्र. ५६,
उत्तरेस वा त्या दिशेस : गट क्र. ९० व गट क्र. ९२,
दक्षिणेस वा त्या दिशेस : गट क्र. ५७, गट क्र. ६५ व ६६

दिनांक : २४.०३.२०२६

सही/-
**तान्या व्ही.राघानी**
**भागीदार**
**हरिदास ॲन्ड कं.**
वकील व सॉलिसिटर्स
३ रा मजला, एक्झामिनर प्रेस बिल्डिंग, ३५ दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ०२३.

## जाहीर नोटीस

दि. २३/०३/२०२६

तमाम जनतेस कळविण्यात येते की आमचे अशिल श्री. शैलेश बाबू म्हात्रे व श्री. वेदांत राजेंद्र म्हात्रे यांनी खालील नमुद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीच्या विक्री संबंधीत बोलणी विद्यमान मालक श्री. भावेश दिनानाथ शेळके यांचेसोबत झालेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे,

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| तळाशेत ता. अलिबाग | १०५ | ०-२३-७० पो.ख ०-०१-६० एकुण ०-२५-३० | १.८१ |

वर वर्णन केलेली मिळकत या जाहिर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या मुळ सही शिक्याची कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

सही/-
**ॲड. आशिष नरेंद्र म्हात्रे**
मु. पेझारी पो. पोयनाड
ता. अलिबाग, जि. रायगड.
मोबा.नं. ९२७३२७३८४३/९६३७२७००१९

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले असून तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान जमीन मालकांचे दरम्यान झालेली आहेत व सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिला आहे. सदर मिळकतीचे मालकी हक्कांबाबतचा शोध घेण्याकरिता व त्या मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणे कामी जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

| मौजे | स.नं. | मिळकत मालकाचे नाव | क्षेत्रफळ हे. आर. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| वाघोलीवाडी, ता.अलिबाग | १७७ | सुशीला रामचंद्र नागावकर, वनिता अनंत शिंगरुत, सुभाष अनंत शिंगरुत, गणेश अनंत शिंगरुत, सचिन अनंत शिंगरुत, संतोष हरिश्चंद्र भगत, पुष्पलता परशुराम म्हात्रे, माधवी महेश पाटील | ०-२८-२० पो.ख. ०-०१-२० एकुण क्षेत्र ०-२९-४० | ६.११ |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाणेयेणेचे मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या १४ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणारे यांचेकडे कळवावे. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनाजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरच्या मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे. सदर नोटीस प्रसिद्ध करण्यास तसेच सदर व्यवहारास सुशीला रामचंद्र नागावकर, वनिता अनंत शिंगरुत, सुभाष अनंत शिंगरुत, गणेश अनंत शिंगरुत, सचिन अनंत शिंगरुत, संतोष हरिश्चंद्र भगत, पुष्पलता परशुराम म्हात्रे, माधवी महेश पाटील यांची कोणत्याही प्रकारची हरकत नाही.

अलिबाग,
दिनांक : २३/०३/२०२६

सही /-
**(ॲड. पुजा दिलीप पाटील)**
मु.पो. कुरुळ,
ता. अलिबाग, जि. रायगड

## रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. केंद्र कार्यालय अलिबाग

**निविदा सुचना**

बँकेच्या केंद्र कार्यालय व जिल्ह्यांतील ५८ शाखा यासाठी पूर्ण वेळ स्विपर्स, केंद्र कार्यालयाकरीता सिक्युरीटी गार्डस तसेच हत्यारधारी सिक्युरीटी गार्डस् यांची आवश्यकता आहे.

स्विपर्स, केंद्र कार्यालयाकरीता सिक्युरीटी गार्डस तसेच हत्यारधारी सिक्युरीटी गार्डस पुरविणाऱ्या इच्छुक सहकारी संस्थांकडून निविदा मागविण्यांत येत आहेत. बँकेस ३ वर्षाचे कालावधीसाठी स्विपर्स, केंद्र कार्यालयाकरीता सिक्युरीटी गार्डस तसेच हत्यारधारी सिक्युरीटी गार्डस् ची आवश्यकता आहे. हा कालावधी कमी अथवा अधिक ठेवण्याचा अधिकार बँकेचा राहील.

निविदेमध्ये पुरविण्यांत येणाऱ्या स्विपर्स, केंद्र कार्यालयाकरीता सिक्युरीटी गार्डस तसेच हत्यारधारी सिक्युरीटी गार्डस यांचा दरमहाचा मेहनताना नमूद करणे आवश्यक आहे. निविदेसोबत रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि, केंद्र कार्यालय अलिबाग या नावाचा बँकेच्या अलिबाग शाखेवरील रू.५,०००-०० चा डी.डी. निविदा डिपॉझीट म्हणून जोडावा लागेल. स्विपर्ससंबंधी आवश्यक अटी व शर्ती बँकेच्या केंद्र कार्यालय अलिबाग येथे कार्यालयीन कामकाजाचे वेळी पहावयास मिळतील.

स्विपर्स पुरविणेसंबंधीच्या निविदा बँकेच्या मुख्य कार्यालय अलिबाग येथे दिनांक २४.०३.२०२६ ते दिनांक ३०.०३.२०२६ या कालावधीमध्ये सायंकाळी ४:०० वाजेपर्यंत सुट्टीचा कालावधी वगळता खाली सही करणारे स्वाक्षरीकार यांचे नावाने सादर कराव्यात. मुदतीनंतर आलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

कोणतेही कारण न देता कमी अगर जास्त मेहनताऱ्याची निविदा डिपॉझीट (डी.डी.) नसलेली, अपुर्ण माहितीची अथवा कोणतीही अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार बँकेस राहील.

केंद्र कार्यालय अलिबाग
दिनांक २४.०३.२०२६

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी**

## जाहीर सूचना

याद्वारे जनतेस जाहीरपणे **सूचना** देण्यात येते की, आम्ही (१) यात याखाली लिहिलेल्या **परिशिष्टातील** रकाना (ई) मध्ये सूचीबद्ध केलेल्या व्यक्ती **(''मालक'')** यांच्या यात याखाली लिहिलेल्या **परिशिष्टामध्ये** अधिक विशेषरित्या वर्णन केलेल्या मालमत्तेवरील (यात यानंतर ''**सदर मालमत्ता**'' असा उल्लेख करण्यात आलेला आहे.) आणि (२) मकरंद सुरेश नार्वेकर यांच्या ४,७०० चौरस मीटरपैकी सर्व्हे क्र. २०३(भाग), क्षेत्रफळ १०० चौरस मीटर मालकी हक्काच्या आणि लगतच्या शेतजमिनीच्या त्या सर्व तुकड्यांवरील आणि भागावरील त्यांना प्रदान केलेल्या मार्गाधिकाराच्या संबंधातील अधिकार, हक्क आणि हितसंबध यांची चौकशी करीत आहोत.

सदर मालमत्तेच्या किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या/तुकड्याच्या संबंधातील विक्री, हस्तांतरण, अभिहस्तांतरण, अदलाबदल, अधिकार, हक्क, हितसंबंध, हिस्सा, लाभ, भाडेपट्टा, पोट-भाडेपट्टा, भाडेदारी, पोट-भाडेदारी, अनुज्ञप्ती, धारणाधिकार, गहाण, आकार, भार, भोगवटा, काळजीवाहू तत्व, प्रसंविदा, न्यास, सुविधाधिकार, बक्षिस, वारसा, मृत्यूपत्रीत देणगी, परिरक्षा, ताबा, विकास अधिकार, मार्गाधिकार, आरक्षण, कुटुंब व्यवस्था/तडजोड, करारनामा, प्रलंबित प्रसंविदा, कोणत्याही न्यायालयाचा आदेश किंवा हुकूमनामा, भागीदारी किंवा वाटप किंवा कोणत्याही स्वरूपाचे अन्य काही असेल तर त्याद्वारे कोणताही प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष दावा, आक्षेप, मागणी, हिस्सा, अधिकार, हितसंबंध आणि/किंवा लाभ यांचा दावा सांगणाऱ्या सर्व व्यक्तींनी/संस्थांनी तसेच अन्य गोष्टींबरोबर कोणतीही बँक आणि किंवा वित्तिय संस्था आणि/किंवा प्राधिकरण यांनी निम्नस्वाक्षरीकर्त्यांना त्यांच्या ७०३ आणि ७०४, पिरामल टॉवर, पेनिन्सुला कॉर्पोरेट पार्क, सेनापती बापट मार्ग, लोअर परळ, मुंबई ४०००१३ येथील कार्यालयामध्ये आणि **manisha.paranjape@dhavalvussonji.com** आणि **objections@dhavalvussonji.com**, या ई-मेल वर या जाहिरातीच्या तारखेपासून **१४ (चौदा) दिवसांच्या** आत दस्तावेजी पुराव्यासह लेखी स्वरूपामध्ये सूचना द्यावी, अशी त्यांना विनंती करण्यात येत आहे. अन्यथा अशा व्यक्तीचे किंवा व्यक्तींचे/संस्थांचे कोणतेही दावा किंवा दावे, जर काही असतील तर, त्यांचा अधित्याग, परित्याग, अधित्यजन आणि/किंवा परित्यजन करण्यात आलेला आहे, असे समजण्यात येईल आणि कोणताही दावा अस्तित्वात नसल्याचे गृहीत धरण्यात येईल आणि मालकांना सदर मालमत्तेचे एकमेव अधिकार आहेत, असे गृहीत धरण्यात येईल आणि सदर मालमत्तेच्या संबंधात कोणताही प्रतिकूल अधिकार, हक्क, हितसंबंध किंवा कोणत्याही स्वरुपाची मागणी नाही आणि सदर मालमत्ता भारमुक्त आहे असे समजण्यात येईल.

**यात यावर संदर्भित केलेले परिशिष्ट**
**(सदर मालमत्तेचे वर्णन)**

मापगाव आणि सोगाव गाव, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड; आणि खाली अधिक सविस्तरपणे वर्णन केलेल्या सर्व्हे क्र. १७ एकूण क्षेत्रफळ २२.७३ एकर म्हणजेच ९२,००० चौरस मीटर किंवा त्याच्या आसपासच्या मालकीचा आणि सलग कृषी जमिनीचा तो सर्व तुकडा आणि भाग :

| (अ) अ. क्र. | (ब) सर्व्हे क्र. | (क) ७/१२ उताऱ्यानुसार जमिनीचे क्षेत्रफळ (चौ. मी.) | (ड) गावाचे नाव | (इ) मालकांची नावे |
|---|---|---|---|---|
| १. | १३ | १,६८० | मापगाव | मकरंद सुरेश नार्वेकर |
| २. | १४ | ६,१९० | मापगाव | घनश्याम महाबळेश्वर हेगडे- २००० चौरस मीटर मकरंद सुरेश नार्वेकर २००० चौरस मीटर सादिक नजीर कुर- २१९० चौरस मीटर |
| ३. | १५/१ | ३,०१० | मापगाव | मकरंद सुरेश नार्वेकर |
| ४. | १५/२ | ३,०१० | मापगाव | मकरंद सुरेश नार्वेकर |
| ५. | १५/३ | ३,०१० | मापगाव | मकरंद सुरेश नार्वेकर |
| ६. | १६ (भाग) | ५,१५० | मापगाव | मकरंद सुरेश नार्वेकर |
| ७. | १७७ | २,१०० | सोगाव | मकरंद सुरेश नार्वेकर |
| ८. | १७८ | २,६०० | सोगाव | मकरंद सुरेश नार्वेकर |
| ९. | १७९/१८०/१८१/२ | १३,२०० | सोगाव | मकरंद सुरेश नार्वेकर |
| १०. | १८२ | १०,१०० | सोगाव | मकरंद सुरेश नार्वेकर |
| ११. | १८३/१८४ | १०,६०० | सोगाव | मकरंद सुरेश नार्वेकर |
| १२. | १९२/२ | ३,७०० | सोगाव | मकरंद सुरेश नार्वेकर |
| १३. | १९३ | २,२०० | सोगाव | मकरंद सुरेश नार्वेकर |
| १४. | १९४ | ४,७०० | सोगाव | मकरंद सुरेश नार्वेकर |
| १५. | १९५/१ | ११,५५० | सोगाव | मकरंद सुरेश नार्वेकर |
| १६. | १९६ | ३,४०० | सोगाव | सादिक नझीर कुर |
| १७. | १९७ | ५,८०० | सोगाव | मकरंद सुरेश नार्वेकर |

**आज दिनांक २४ मार्च, २०२६.**

**मनिषा परांजपे**
**भागिदार**
DV
**धवल वसोनजी ॲन्ड असोसिएट्स**
**वकील आणि सॉलिसिटर्स**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमचे अशिल श्री. चेतन यशवंत पाटील, रा. गणेश मंदिराजवळ, दत्तपाडा सारळ, पो. सारळ ता. अलिबाग, जि. रायगड यांनी अलिबाग येथील मे. सि. ज. सि. डि. यांचे कोर्टात स्पे. मु. नं. ९२/२०२५ चा दावा दिनांक ०४/०२/२०२५ रोजीच्या साठेकराराची विशेष पुर्तता करून मिळण्याकरीता, ठरावांकरीता, निरंतर ताकिदीकरीता दाखल केलेला आहे. त्या दाव्याचेकामी मा. न्यायालयाने तुर्तातूर्त मनाई हुकूमाच्या नि.५ कडील अर्जावर गुणवत्तेवर दि. १३/३/२०२६ रोजी आदेश करुन आमचे अशिलांचा अर्ज मान्य केलेला आहे व प्रतिवादी १) श्री. उत्तम हरिश्चंद्र पाटील २) श्री. एकनाथ मगन लखन मयत तर्फे वारस २/१) श्री. रुपेश एकनाथ लखन २/२) श्रीमती सरोजीनी एकनाथ लखन २/३) शारदा मनोज गोयर २/४) राणी राजेश गोयर २/५) दिपाली रवि गोयर यांनी सदर दाव्याचा अंतिम निकाल होईपर्यंत दावा मिळकतीमध्ये त्रयस्थ इसमांचे हक्क निर्माण करु नये व विकटीक करु नये इत्यादी असा तुर्तातूर्त मनाई हुकूमाचा आदेश वरील प्रतिवादी विरुद्ध केलेला आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| तलवडे, ता.अलिबाग | २६९/१ | ०१-७०-६० पो.ख ००-११-४० ०१-८२-०० | ३-४९ |

वर नमूद मिळकतीपैकी प्रतिवादी क्र.१ व प्रतिवादी क्र. २/१ ते २/५ यांचा सदर मिळकतीत असणारा अविभाज्य हिस्सा म्हणजेच प्रत्येकी ०-३६-४ हे. आर प्रमाणे एकूण क्षेत्र ०-७२-८ हे. आर हा या जाहीर नोटीसचा विषय आहे.

तरी वरील आदेश लक्षात घेता कोणीही, कसलाही व्यवहार वरील प्रतिवादी विरुद्ध करु नये व तसा कोणताही व्यवहार कोणीही केल्यास ते दावा मिळकतीचे. प्रामाणिक खरेदीदार होणार नाहीत व त्याचे विरुद्ध आमचे अशिल पुढील कायदेशीर कारवाई करतील.
हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दि. २३-०३-२०२६.

सही/-
**ॲड. आर. बी. कोसमकर**
चिरायु बिल्डींग, राम मंदिर शेजारी
ब्राम्हण आळी अलिबाग

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी मौजे अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनाची निवासी सदनिका मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड येथील अलिबाग नगरपरिषद हद्दीतील सिटी सर्व्हे नं.७४१/अे ७४१बी, या जमीन मिळकतीवर बांधण्यात आलेली नातू रीजन्सी या इमारतीमधील निवासी सदनिका मिळकत क्र. २०४ क्षेत्र ७११ चौ. फुट अलिबाग नगरपरिषद मालमत्ता क्र. ALB000001888 निवासी सदनिका मिळकत सदर नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली बांधकाम मिळकत हि विद्यमान मालक श्री. निमिष नरेश मगर, यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, त्या विकणेचा त्यांस पुर्ण कायदेशीर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या निवासी सदनिका मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची निवासी सदनिका मिळकत हि विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरुन आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे.

ठिकाण - अलिबाग
दिनांक - २३/०३/२०२६
मोबा. नं. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
ऑफिस लक्ष्मी नारायण, पहिला मजला,
गाळा नं. ७ व ८, ब्राम्हण आळी, राम मंदिर समोर, ता. अलिबाग, जि. रायगड ४०२२०१

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली शेती मिळकत असून त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. कनवर्जीत सिंघ सोहन सिंघ नारूला रा.१०, पेरीना बिल्डींग, नेपियन्सी रोड, मलबार हिल, मुंबई ४००००६ यांच्याकडून सदरची मिळकत कायम विकत घेणेबाबत व्यवहार आमचे अशिल यांनी ठरविलेला आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र.व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| आगरसुरे ता.अलिबाग जि.रायगड | २२२ | ०-०६-०० | ०.१० |

आणि त्यामधील असलेले ग्रामपंचायत आगरसुरे ता. अलिबाग जि. रायगड घर नं.४६२ क्षेत्र १०१०.०० चौ. फुट अशी सर्व मिळकत हि या जाहीर नोटीसचा विषय आहे.

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क हितसंबंध बोजा अथवा गहाण, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेंटेनन्स, मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध व हरकत असल्यास अशा व्यक्तींनीसदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यांसह आपली हरकत खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (१४) चौदा दिवसांचे आत आणून द्याव्यात. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाची कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लीअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यात येईल, हे सर्वास कळावे.

अलिबाग
तारीख /०३/२०२६

सही/-
**ॲड. शैलेश प्रभाकर पाटील**
दुय्यम निबंधक अलिबाग कार्यालयासमोर
पो.अलिबाग ता.अलिबाग जि.रायगड.


## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने नविन डिझाईन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

# हर्षवर्धन सदगीर डबल महाराष्ट्र केसरी



## अटीतटीच्या लढतीत महेंद्र गायकवाड ठरला उपविजेता

**। पुणे । प्रतिनिधी ।**

पुण्यातील वाघोली येथे ६८ व्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेचे आयोजन रामकृष्ण अण्णा सातव पाटील यांनी केले होते. शालेय शिक्षण मंत्री दादासाहेब भुसे आणि कृषीमंत्री दत्तात्रय भरणे याच्या उपस्थितीमध्ये फायनल कुस्ती लावण्यात आली होती. फायनलमध्ये नाशिकच्या हर्षवर्धन सदगीर याने ४-३ ने विजय मिळवला. लाल कॉस्ट्यूममध्ये हर्षवर्धन सदगीर आणि निळ्या कॉस्ट्यूममध्ये महेंद्र गायकवाड खेळत होता. नाशिकला त्याच्या रूपाने दुसरी महाराष्ट्र केसरीची गदा मिळाला आहे. तर हर्षवर्धन हा महाराष्ट्राचा सातवा डबल केसरी ठरला आहे.

सहा मिनिटांचे दोन राऊंड असतात, त्यामधील पहिल्या राऊंडमध्ये दोघांनी एक एक गुण घेतला होता. पहिल्या राऊंडमध्ये गुणांची बरोबरी होती. दुसऱ्या राऊंडमध्ये दोघेही आक्रमक झाले. शेवटच्या दीड मिनिटांमध्ये तीन गुण मिळवत हर्षवर्धनने आघाडी घेतली. गायकवाडनेही तीन गुण मिळवले पण वेळ संपल्याने तो पराभूत झाला.

हर्षवर्धन सदगीर याने गादी विभागाच्या अंतिम फेरीमध्ये सोलापूर शहरच्या जयराम पाटील याला पराभूत केले होते. अंतिम फेरीमध्ये १०-० ने हर्षवर्धन याने एकहाती विजय मिळवला होता. उपांत्य फेरीमध्ये हर्षवर्धन सदगीर याने पृथ्वीराज पाटील याचा पराभव केला होता. हर्षवर्धन सदगीर याने याआधी महाराष्ट्र केसरीचा २०१९चा किताब पटकावला होता. त्यावेळी त्याने वेताळ शेळकेला पराभूत करत पहिल्यांदा किताब पटकावला होता. त्यानंतर हर्षवर्धन याने सात वर्षांनी कमबॅक करत फायनलपर्यंत विजेतेपदाच्या ट्रॉफीवर नाव कोरले.

अंतिम लढतीला रात्री पावणेनऊच्या सुमारास सुरुवात झाली. बाहुबली नावाने ओळखल्या जाणाऱ्या महेंद्रने सुरवातीलाच हर्षवर्धनला रिंगच्या बाहेर फेकण्याचा प्रयत्न केला. यात महेंद्रने एका गुणाची कमाई केली. यानंतर हर्षवर्धनने कुस्ती टाळण्याचा प्रयत्न केल्याने पंचांनी त्याला समज दिली. याचा फायदा घेऊन महेंद्रचा दुहेरी पटाचा प्रयत्न हर्षवर्धनने धुडकावला. महेंद्र नकारात्मक खेळत असल्याने पंचांकडून कुस्ती खेळण्याची सूचना देण्यात आली. मात्र, सूचना देवूनही महेंद्र नकारात्मक खेळत असल्याने पंचांनी हर्षवर्धनला एक गुण दिला. यामुळे चिडलेल्या महेंद्रने हप्ते डावाची पकड केली. पण, त्यात त्याला यश आले नाही. पहिल्या तीन मिनिटांच्या खेळात १-१ अशी बरोबरी राहिली.

दुसऱ्या फेरीत सुरुवातीलाच महेंद्रने पट काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, हर्षवर्धनने त्याचा प्रयत्न हाणून पाडला. यानंतर नकारात्मक पद्धतीने एकमेकांना रोखल्याने पंचांनी मल्लांना ताकीद दिली. थोड्या वेळाने महेंद्रला पंचांकडून पुन्हा समज देण्यात आली. कुस्ती टाळल्याने वारंवार समज दिल्यानंतर महेंद्रला ३० सेकंदांची मॲक्टिव्हिटीफ वेळ दिली. त्यात महेंद्रला गुण घेता आला नाही. त्यामुळे हर्षवर्धनला एक गुण मिळाला. यानंतर दमलेल्या महेंद्रला हर्षवर्धनने लोळविले आणि दोन गुण मिळवले. नंतर चिडून महेंद्रने हर्षवर्धनला मारण्याचा प्रयत्न केला. या वेळीही पंचांकडून ताकीद मिळाली. अखेरच्या काही सेकंदांत महेंद्रने हर्षवर्धनला बाहेर टाकून एक गुण घेतला खरा; पण त्याचा निकालावर फारसा परिणाम झाला नाही. सलग दुसऱ्यांदा आणि एकूण तिसऱ्यांदा महेंद्रला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. महेंद्र गायकवाड याने माती विभागामध्ये चपळ चिता म्हणून देशभर प्रसिद्ध असलेल्या सिकंदर शेखला ३-०ने पराभूत केले होते. पहिल्या राऊंडमध्येच त्याने सिकंदरवर आक्रमण चढवलं होतं. सिकंदरसारख्या तगड्या मल्लाला त्याने एकही गुण घेऊन दिला नाही. त्याआधी झालेल्या उपांत्य फेरीत महेंद्र गायकवाड याने सोलापूरच्या रविराज चव्हाण याला पराभूत केले होते.

**महाराष्ट्र केसरी २०२६ चा विजेता हर्षवर्धन सदगीर याला मानाची गदा, फॉर्च्युनर कार आणि पाच लाख मिळणार आहे. तर उपमहाराष्ट्र केसरी महेंद्र गायकवाडला स्कॉर्पिओ आणि चार लाखांचे पारितोषिक देण्यात येणार आहे. १८ बुलेटचही वजनी गटातील विजेत्यांना देण्यात आल्या आहेत. त्यासोबतच ८४० खेळाडू २०० पंच आणि खेळाडूंना ट्रॅक सूट आणि खेळाडूंना ड्रायफ्रूटचा खुराक आयोजकांकडून देण्यात आला.**

## निवडक



### निहालला आंतर विद्यापीठ तायक्कांदो स्पर्धेत कांस्य

**पनवेल ग्रामीण :** जालंधर (पंजाब) येथे पार पडलेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ तायक्कांदो स्पर्धेत पनवेलच्या निहाल संजय भोईर याने पुरुषांच्या ८० किलो वजनी गटात दमदार खेळ करत कांस्य पदक पटकावले. त्याच्या या यशामुळे रायगड जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्रात अभिमानाची भर पडली आहे. याच स्पर्धेत श्रीजय हरेश्वर भगत यानेही उत्कृष्ट कामगिरी करत टॉप ८ मध्ये स्थान मिळवले. दोन्ही खेळाडूंनी आपल्या जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर पनवेलचे नाव राष्ट्रीय स्तरावर उज्ज्वल केले आहे. या यशाबद्दल विविध मान्यवरांकडून खेळाडूंचे अभिनंदन करण्यात येत आहे. तसेच तायक्कांडो संघटनांतील पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या कामगिरीचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

### आकाश दीप आयपीएलमधून बाहेर

**कोलकाता :** कोलकाता नाइट रायडर्सला आयपीएलपूर्वी आणखी एक धक्का बसला आहे. संघाचा वेगवान गोलंदाज आकाश दीप संपूर्ण हंगामातून बाहेर पडला आहे. शनिवारी क्रिकेट वेबसाइट क्रिकबझला फ्रँचायझीच्या एका अधिकाऱ्याने याची पुष्टी केली.२९ वर्षीय बंगालच्या या गोलंदाजाला गेल्या वर्षी अबू धाबीमध्ये झालेल्या मेगा लिलावात १ कोटी रुपयांच्या मूळ किमतीवर संघाने विकत घेतले होते. मात्र, तो अद्याप संघाच्या शिबिरात सामील झालेला नाही.आकाश दीप बंगळुरू येथील सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये रिहॅब करत आहे. त्याची दुखापत कोणत्या प्रकारची आहे, हे स्पष्ट होऊ शकलेले नाही, परंतु व्यवस्थापन आणि फ्रँचायझी यांच्यात याबाबत चर्चा झाली आहे. केकेआरसाठी ही चिंता वाढवणारी बातमी आहे, कारण यापूर्वी हर्षित राणा आणि मथीश पथिराना यांच्याबाबतही संघाला अनिश्चिततेचा सामना करावा लागत आहे. पथिरानाला अजून श्रीलंका क्रिकेटकडून मंजुरी मिळणे बाकी आहे. संघाने १८ मार्चपासून कोलकाता येथे शिबीर सुरू केले आहे, परंतु आकाश दीप त्यात सहभागी होऊ शकला नाही.श्रीलंकेचा वेगवान गोलंदाज मथीशा पथिराना देखील दुखापतीमुळे सध्या उपलब्ध नाही. मात्र, केकेआर त्याला बदलू इच्छित नाही, कारण फ्रँचायझीला आशा आहे की तो आयपीएलदरम्यान कधीतरी संघात सामील होऊ शकतो. केकेआरने मेगा लिलावात पथिरानाला १८ कोटी रुपयांना विकत घेतले होते.

### अल्काराझ मियामी ओपनमधून बाहेर

**सिडनी :** मियामी ओपनमध्ये रविवारी मोठा उलटफेर पाहायला मिळाला. सध्याचा ऑस्ट्रेलियन ओपन विजेता कार्लोस अल्काराज स्पर्धेच्या तिसऱ्या फेरीत पराभूत होऊन बाहेर पडला आहे. त्याला अमेरिकेच्या सेबॅस्टियन कोर्डाने तीन सेटच्या अटीतटीच्या लढतीत ६-३, ५-७, ६-४ असे हरवले. सामना २ तास १९ मिनिटे चालला.पहिल्या सेटमध्ये ३-६ ने पिछाडीवर पडल्यानंतर आणि दुसऱ्या सेटच्या सुरुवातीला सर्व्हिस तुटल्यानंतर त्याने आपल्या बॉक्सकडे ओरडत म्हटले, आता माझ्याकडून आणखी सहन होत नाही. मी घरी जात आहे... मी आता आणखी सहन करू शकत नाही. त्याच्या या वागण्याने चाहत्यांना आश्चर्यचकित केले, कारण तो सहसा मैदानावर शांत आणि हसतमुख दिसतो. दुसऱ्या सेटमध्ये एका वेळी कोर्डा ५-४ ने पुढे होता आणि मॅचसाठी सर्व्ह करत होता. येथे अल्काराझने पुनरागमनाचा प्रयत्न केला आणि सलग पाच गेम जिंकून स्कोअर बरोबरीत आणला. मात्र, या काळातही त्याच्या चेहऱ्यावरील ती नेहमीची चमक आणि विजयाचा जल्लोष गायब होता. निर्णायक सेटमध्ये २५ वर्षीय कोर्डाने आपले संयम राखले आणि २ तास १९ मिनिटे चाललेला हा सामना ६-४ ने जिंकला.सेबॅस्टियन कोर्डा सध्या एटीपी रँकिंगमध्ये ३६व्या स्थानावर आहे. गेल्या वर्षी डेव्हिड गॉफिननंतर, कोर्डा हा अल्काराझला या स्पर्धेत हरवणारा सर्वात कमी रँकिंग असलेला खेळाडू बनला आहे. या पराभवासह मियामी ओपनमध्ये अल्काराझचा खराब रेकॉर्ड कायम राहिला.

## दापोली जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा

# जय बजरंग रोहाची दमदार कामगिरी

**। खांब । प्रतिनिधी ।**

दापोली येथे २० मार्च रोजी गावदेवी क्रीडा मंडळाच्या वतीने जाखमाता उत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या भव्य जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत जय बजरंग रोहा संघाने दमदार कामगिरी करत विजेतेपद पटकावले आहे.




अत्यंत चुरशीच्या अंतिम सामन्यात जय बजरंग रोहा संघाने दर्यावर्दी नागांव बंदर संघावर मात करत प्रथम क्रमांक मिळवला. या विजयाबद्दल संघाला ३३,३३३ रोख रक्कम व आकर्षक चषक प्रदान करण्यात आला. या स्पर्धेत भैरवनाथ यशवंतखार व स्वयंभू भातसई संघांनी अनुक्रमे तृतीय व चतुर्थ क्रमांक पटकावला. वैयक्तिक कामगिरीतही जय बजरंग रोहा चमकला. वैयक्तिक कामगिरीत जय बजरंग रोहाच्या राकेश गायकवाडला सर्वोत्कृष्ट खेळाडू किताब मिळाला.

तसेच इतर वैयक्तिक पुरस्कारांमध्ये अषिश मोरे (भातसई) याला उत्कृष्ट चढाई, सनी भगत (यशवंतखार) याला उत्कृष्ट पक्कड, तर मंथन सुर्वे (नांदगांव) याला पब्लिक हिरो पुरस्कार देण्यात आले. अंतिम सामनात अत्यंत चुरशीचा ठरलेल्या लढतीत जय बजरंग रोहाने सर्वोत्तम कामगिरी केल्याने हा सामना प्रेक्षकांसाठी विशेष आकर्षण ठरला.

### पाकिस्तान क्रिकेटमध्ये टॉक्सिक वातावरण

**लाहोर:** पाकिस्तान संघाचे माजी मुख्य प्रशिक्षक गॅरी कर्स्टन यांनी पाकिस्तान क्रिकेट बोर्ड वर आरोप केले आहेत. संघातील सततचा हस्तक्षेप आणि खराब वातावरणामुळे काम करणे अत्यंत कठीण झाले होते. कर्स्टन यांनी सहा महिन्यांतच पाकिस्तानच्या प्रशिक्षकपदाचा राजीनामा दिला होता.कर्स्टन म्हणाले, बाह्य हस्तक्षेप खूप जास्त होता, ज्यामुळे संघाच्या निर्णयांवर आणि कामगिरीवर नकारात्मक परिणाम होत होता.

# काळभैरव उडदवणे संघ ठरला विजेता

**। खांब । प्रतिनिधी ।**

रोहा तालुक्यातील नवतरुण धाकेश्वर देवकान्हे यांच्या वतीने संपन्न करण्यात आलेल्या विभागीय क्रिकेट स्पर्धेत काळभैरव उडदवणे संघाने अंतिम सामन्यात सर्वोत्तम कामगिरी करून विजेतापदाचा मानकरी ठरण्याचा बहुमान पटकावला आहे.



या स्पर्धेचे उद्घाटन बाळकृष्ण बामणे, मंगेश भोईर, नारायण कान्हेकर, दिलीप कान्हेकर आदी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

अंतिम सामन्यातील चुरशीच्या लढतीत काळभैरव उडदवणे संघाने उपविजेत्या कोलाड हिल्स या संघाचा पराभव करून हे सुयश संपादित केले आहे. या स्पर्धेत उत्कृष्ट फलंदाज म्हणून अरविंद चिकणे, उत्कृष्ट गोलंदाज व सामनावीर म्हणून मयूर कराळे यांना तसेच विजेत्या संघांना बक्षिस समारंभासाठी लाभलेले प्रमुख पाहुणे उपक्रमशिल शिक्षक अरूण आगळे व युवा समाजसेवक संदेश गायकवाड यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी खांब विभाग क्रिकेट असोसिएशन पदाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली नवतरुण धाकेश्वर देवकान्हे संघाने सहकार्य केले.

## वर्ल्ड इनडोअर चॅम्पियनशिप स्पर्धा

# जॉर्डनला सुवर्णपदक

**। अमेरिका । वृत्तसंस्था ।**




ट्रॅक अँड फील्डच्या जगात एक नवीन स्प्रिंट सनसनी उदयास आली आहे. अमेरिकेच्या २१ वर्षीय जॉर्डन अँथनीने वर्ल्ड इनडोअर चॅम्पियनशिपच्या ६० मीटर शर्यतीत सुवर्णपदक जिंकून केवळ इतिहासच रचला नाही, तर आपल्या संघर्षमय कथेद्वारे सर्वांना प्रेरणाही दिली. अँथनीने ६.४१ सेकंदांची वेळ नोंदवली, जी इतिहासातील चौथी सर्वात वेगवान वेळ आहे.

शर्यतीच्या अवघ्या ३६ तास आधी त्याला एका गंभीर समस्येचा सामना करावा लागला होता. पोलंडमध्ये पोहोचल्यानंतर डोप चाचणीदरम्यान एका अधिकाऱ्याने रक्त काढताना सुई नसेत न लागता बाहेर लागली, ज्यामुळे त्याच्या हातात रक्ताची गाठ झाली. तो आपला हात व्यवस्थित हलवूही शकत नव्हता. यावरही त्याने हार मानली नाही आणि वेदनेसहच मैदानात उतरण्याचा निर्णय घेतला.

जॉर्डन अँथनीची कथा आणखी खास आहे कारण त्यांनी अवघ्या नऊ महिन्यांपूर्वीच व्यावसायिक अॅथलेटिक्समध्ये पाऊल ठेवले आहे. यापूर्वी ते कॉलेज फुटबॉलमध्ये आर्कान्सास रेझरबॅक्स संघाकडून खेळत होते. जेव्हा त्यांना विचारण्यात आले की त्यांनी एनएफएलचे स्वप्न का सोडले, तेव्हा त्यांनी स्पष्टपणे सांगितले, कारण येथे कोणीही मला धडक देण्यासाठी माझ्या दिशेने धावत नाहीये.

रोमांचक अंतिम सामन्यात अटीतटीची लढत पाहायला मिळाली. जमैकाच्या किशाने थॉम्पसनने ६.४५ सेकंदांसह रौप्य पदक जिंकले, तर अमेरिकेच्या ट्रेव्हॉन ब्रोमेलनेही ६.४५ सेकंदांसह कांस्य पदक पटकावले. याचा निर्णय फोटो फिनिशने झाला. ब्रिटनचा जेरमायाह अजू अवघ्या ०.०१ सेकंदाने पदकापासून वंचित राहिला. अँथनी १०० मीटर ऑलिम्पिक चॅम्पियन नोआ लायल्सच्या प्रशिक्षण गटाचा भाग आहे. तो म्हणाला, मी इतरांच्या शर्यती पाहतो. हे अगदी फुटबॉलमध्ये आपण दुसऱ्या संघाचे विश्लेषण करतो त्यासारखेच आहे. ट्रॅक अँड फील्डमध्ये अनेक लोक असे करत नाहीत, पण मी माइंड गेमवर लक्ष केंद्रित करतो. मला माहित असते की समोरचा काय चांगले करतो आणि काय नाही.

# हिरकणी अन् पालघर बॉईज संघ अजिंक्य

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

माझगाव डॉक स्पोर्टस् क्लब आणि मानव संसाधन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आंतर विभागीय पुरुष व महिला गट कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. महिलांच्या अंतिम सामन्यात हिरकणी संघाने शिवकन्या संघाचा प्रतिकार चुरशीच्या लढतीत ३२-२९ असा मोडून काढत पहिले जेते होण्याचा मान पटकाविला. हिरकणीची राणी मडके स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू ठरली. श्रुती तोडणकर, प्रतिक्षा भोईर या स्पर्धेतील अनुक्रमे उत्कृष्ट चढई व पकडीचे खेळाडू ठरले.



पुरुष विभागात विजेतेपदाचा मान पालघर बॉईजने फायर ब्रिगेड संघावर ३५-१४ अशी मात करीत मिळविला. विनायक पाटील या स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू ठरला. शिरीष भगत, रोहित पाटील या स्पर्धेतील अनुक्रमे उत्कृष्ट चढाई व पकडीचे खेळाडू ठरले. पुरुषांत १६ संघ सहभागी झाले होते. या स्पर्धेचे बक्षीस वितरण कबड्डीतील शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त सिताराम साळुंखे, माझगाव डॉक, मानव संसाधन विभागाचे कार्यकारी संचालक अरुणकुमार चांद यांच्या हस्ते करण्यात आले.

# थरारक जलक्रीडांनी रंगला रिगाटा महोत्सव

**। पुणे । वृत्तसंस्था ।**

वाहत्या पाण्यावर नानाविध नौकांच्या साह्याने सादर झालेल्या थरारक प्रात्यक्षिकांनी सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाचा रिगाटा महोत्सव जल्लोषात पार पडला. ९८ वर्षांची परंपरा लाभलेल्या या महोत्सवाने साहस, एकता आणि उत्कृष्टतेची परंपरा पुन्हा एकदा अधोरेखित केली.

सीओईपी बोट क्लबतर्फे आयोजित महोत्सवात कयाक बॅलेट, शेल गेम्स, पंट फॉर्मेशन, टेलीमॅचेस, मशाल नृत्य अशा विविध जलक्रीडा प्रकारांचे सादरीकरण करण्यात आले. क्षितिजाच्या पलिकडे नौकानयन हे यंदाचे ब्रीदवाक्य होते.

सुमारे ५० ते ६० बोटी आणि २५० ते ३०० स्पर्धकांनी सहभाग घेतला. कायक्स, कॅनोई, स्कल्स, पँट्स आणि टफ्स या विविध प्रकारच्या नौकांनी सादर केलेल्या फॉर्मेशन आणि वेगवान हालचालींनी प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले. या कार्यक्रमाला सुमारे २५०० हून अधिक प्रेक्षक उपस्थित होते.

### द.आफ्रिकेने न्यूझीलंडला हरवले

**। वेलिंग्टन । वृत्तसंस्था ।**

वेलिंग्टनमध्ये खेळल्या गेलेल्या चौथ्या टी-२० मध्ये दक्षिण आफ्रिकेने न्यूझीलंडला १९ धावांनी हरवून मालिका २-२ अशी बरोबरीत आणली. पाचवा सामना २५ मार्च रोजी हॅग्ले ओव्हलमध्ये खेळला जाईल.रविवारी प्रथम फलंदाजी करताना संघाने २० षटकांत १६४/५ धावा केल्या. प्रत्युत्तरात न्यूझीलंडचा संघ १८.५ षटकांत १४५ धावांवर सर्वबाद झाला. दक्षिण आफ्रिकेसाठी कॉनर एस्टरहुइजनने ३६ चेंडूत ५७ धावांची खेळी केली.

## 'खारेपाट श्री'चा मानकरी समीर म्हात्रे | सोनू कामी, वैष्णवी घरत या महिलांची भरारी

# प्रशांत कावजी बनला 'रायगड श्री'

**। खारेपाट । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील जय हनुमान बेलपाडा,कावाडे व्यायाम शाळा व शरद म्हात्रे आयोजित रायगड जिल्हास्तरीय बॉडीबिल्डीग स्पर्धेत जय हनुमान रायगड श्री २०२६ चा डिवाईन इनजी जिम अलिबागचा प्रशांत कावजी मानकरी ठरला. तर एचआर फिटनेस झिराड अलिबागचा श्रेयश म्हात्रे उपविजेता ठरला. मसल प्लॅनेट जिम तळा खारेपाट अंतर्गत सुनिल म्हात्रे भोईर जिमचा स्वप्नील सकपाळ, बेस्ट पोजर ठरला. तसेच खारेपाट श्रीचा मानकरी समीर म्हात्रे ठरला.



सदर स्पर्धेत कोकण बॉडीबिल्डीग अँड फिजिक स्पोर्ट्स वेल्फेअर असोसिएशन अलिबाग-रायगड यांच्या मान्यतेने संपन्न झाल्या.सदर स्पर्धेत अलिबाग तालुक्यासह रायगड जिल्ह्यातील सुमारे १०० स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. सदर स्पर्धा गेली १६ वर्षे सातत्याने भरवणारे आयोजक शरद म्हात्रे यांचे मोलाचे योगदान आहे. तसेच सदर स्पर्धेचा शुभारंभ माजी उपसभापती अनिल पाटील, आयोजक शरद म्हात्रे व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते झाला.

सदर स्पर्धेला प्रमुख अतिथी डी.एल सालावकर विस्तार अधिकारी अ.पं.पंचायत समिती, रायगड जिल्हा वरिष्ठ उपाअध्यक्ष राजाभाऊ ठाकूर, माजी पंचायत समिती सदस्य रंजित राणे, कैलास गजणे शिवसेना तालुकाप्रमुख, श्रीकांत पाटील, नितेश पाटील ग्रा.पं.सदस्य, तसेच खारेपाटातील सरपंच, उपसरपंच, सदस्य व विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच महिला वर्ग व युवक-युवती उपस्थित होत्या.

विशेष म्हणजे बॉडीबिल्डीग स्पर्धेत महिला स्पर्धेकांनी सहभाग घेऊन कार्यक्रमाची शोभा वाढवली. सोनू कामे व वैष्णवी घरत यांनी हजारो प्रक्षेकांना आचार्य चकित केले. यावेळी उपस्थित सर्व मान्यवरांचा स्वागत आयोजक शरद म्हात्रे यांनी केला. स्पर्धेला बॉडीबिल्डिंग असोसिएशनचे पदाधिकारी अनिकेत कदम, दर्शन जाधव, सुनिल भोईर आदी पदाधिकारी स्पर्धा पाहण्यासाठी उपस्थित होते.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)